अत्याधुनिक नेत्र शिबीर
चष्मा घालवा कायमचा
कॉन्ट्यूरा व्हिजन * मोतिबिंदू * काचबिंदू * नेत्ररोपण
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात लेसर नेत्रशस्त्रक्रिया
शनिवार सकाळी १० ते १
वर्धमान, माणिक चौक, अ नगर ४१४००१
डॉ. कांकरियांचे साई सूर्य नेत्रसेवा
दृष्टी साजरी करा
Help line 9112288611 / 8888982222

संस्थापक के. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
खवय्यांसाठी खास पंजाबी
छोले भटूरे
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
पार्सल सुविधा उपलब्ध..
एल.जी.शोरूम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.- 85306 40202

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. ०९.०९.२०२५ | अंक नं. १३६ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

किमान 20% किंवा
जेवढ्या वजनाचा सोन्याचा दागिना.. तेवढी टक्के मजुरीत सूट..
ऑफर 27 ऑगस्ट ते 21 सप्टेंबर 2025 पर्यंत वैध
1gm ते 20gm मंगळसूत्र 20% मजुरीत सूट
30gm चे मंगळसूत्र 30% मजुरीत सूट
40gm चे मंगळसूत्र 40% मजुरीत सूट
60gm चे मंगळसूत्र 60% मजुरीत सूट
80gm चे मंगळसूत्र 80% मजुरीत सूट
100gm चे मंगळसूत्र 100% मजुरीत सूट
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
योजनेचा नियम : सोन्याचा प्रती एक दागिना व हजर स्टॉकवर लागू.
Conditions Apply*

# बिबट्याच्या हल्ल्यात ३ वर्षीय बालकाचा मृत्यू

पारनेर – पारनेर तालुक्यातील सिद्धेश्वरवाडी रस्त्यावरील बारामती ॲग्रो परिसरात ८ सप्टेंबर रोजी रात्री साडेनऊ वाजण्याच्या सुमारास एका ३ वर्षीय बालकावर बिबट्याने हल्ला करून त्याला जंगलाकडे ओढून नेल्याची धक्कादायक घटना घडली. अमन पन्नूलाल खुंटे असे मयत बालकाचे नाव आहे. बांधकाम मजूर असलेल्या परप्रांतीय कुटुंबातील अमन हा लघुशंकेसाठी घराबाहेर आला असताना, आईच्या डोळ्यासमोरच बिबट्याने त्याच्यावर झडप घातली.

स्थानिकांनी तात्काळ वन विभागाला माहिती दिली. वन विभागाने युद्धपातळीवर शोधमोहीम सुरू केली, ज्यात स्थानिक नागरिकही सहभागी झाले. रात्री उशिरापर्यंत शोधकार्य सुरू होते. ९ सप्टेंबर रोजी सकाळी आठ वाजता सिद्धेश्वरवाडी परिसरातील जंगलात, घटनास्थळापासून एक किलोमीटर अंतरावर झाडाझुडपात अमनचा मृतदेह आढळला. शोधमोहिमेत वनपरिक्षेत्र अधिकारी जी. व्ही. धाडे, वनपाल एम. वाय. शेख, वनरक्षक अफसर पठाण, फारुख शेख, कानिफनाथ साबळे, एस. के. कारले, साहेबराव भालेकर, अंकराज जाधव यांनी सहभाग घेतला.

**एकाच आठवड्यातील दुसरी घटना, नागरिक भयभीत**


बिबट्याने झडप घालून जंगलाकडे ओढून नेलेल्या बालकाचा शोध घेताना वन विभागाचे पथक व नागरिक.

बिबट्याचा शोध घेण्यासाठी परिसरात पिंजरे लावण्यात आले असून, गस्त वाढवली आहे. यापूर्वी २ सप्टेंबरला कळस येथेही अशीच दुर्दैवी घटना घडली होती. एका आठवड्यात तालुक्यातील दोन घटनांमुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण आहे. पाळीव प्राण्यांवरील बिबट्याच्या हल्ल्यांमुळेही चिंता वाढली आहे. वन्यप्राण्यांचा मानवी वस्तीत वाढता प्रवेश चिंताजनक ठरत आहे. वन विभागाने नागरिकांना रात्री सावध राहण्याचे आणि मुलांना एकटे न सोडण्याचे आवाहन केले आहे. या घटनेचा तपास सुरू असून, परिसरात सतर्कता बाळगण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.



एमआयडीसीतील अहिल्यानगर-मनमाड महामार्गावरील रेणुकामाता मंदिराच्या कमानी समोरील वाहतूक सिग्नलला वाहनाने धडक दिल्याने तो रस्त्यावर कोसळला. हा सिग्नलचा खांब रस्त्याच्या कडेला असलेल्या दुसऱ्या सिग्नलच्या खांबाशी जोडलेला असल्याने त्याची वायर रस्त्यावर पडली असून त्यामुळे एखादी मोठी दुर्घटना होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. (छाया– संजय जोशी)

# पिस्तुलाचा धाक दाखवून महिलेचे दागिने पळविले

नगर – महिलेचे तोंड दाबून तसेच तिला पिस्तुलाचा धाक दाखवत जीवे मारण्याची धमकी देवून ३ अनोळखी लुटारूंनी तिच्या गळ्यातील व कानातील सुमारे ८ तोळे सोन्याचे दागिने लुटून नेल्याची घटना नगर तालुक्यातील कापूरवाडी शिवारात पिंपळगाव उज्जैनी रोडवर असलेल्या दुसुंगे मळ्यात ८ सप्टेंबर रोजी सकाळी ११.३० वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत सौ.सरस्वती शिवाजी दुसुंगे (वय ६२, रा. दुसुंगे मळा, पिंपळगाव उज्जैनी रोड, कापूरवाडी, ता.नगर) यांनी भिंगार कॅम्प पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या ८ सप्टेंबर रोजी सकाळी ११.३० च्या सुमारास दुसुंगे मळ्यातील मळगंगा देवी मंदिराच्या पाठीमागे असताना अचानक ३ अनोळखी इसम तेथे आले. त्यांनी फिर्यादी यांचे तोंड दाबले, त्यांना पिस्तुल दाखवत आरडाओरडा केला तर गोळ्या घालून जीवे ठार मारु अशी धमकी दिली. त्यानंतर त्यांच्या गळ्यातील ३५ ग्रॅम वजनाची सोन्याची मोहन माळ, १५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे डोरले, १५ ग्रॅम वजनाची सोन्याची पोत, १५ ग्रॅम वजनाचे कानातील झुबे, वेल असा २ लाख ३५ हजार रुपये किंमतीचा ८ तोळे वजनाचा ऐवज बळजबरीने काढून घेत तेथून ते पसार झाले.

ही घटना फिर्यादी यांनी कुटुंबियांना सांगितल्यावर कुटुंबीयांनी पोलिसांना घटनेची माहिती दिली. ही माहिती मिळताच भिंगार कॅम्प पोलिस ठाण्याचे स.पो.नि. जगदीश मुलगीर, पोलिस उपनिरीक्षक गजेंद्र इंगळे यांनी पथकासह घटनास्थळी भेट दिली. त्यानंतर सौ. सरस्वती दुसुंगे यांच्या फिर्यादी वरून ३ अनोळखी लुटारूंच्या विरुध्द बीएनएस कलम ३०९ (४), ३ (५), ३५२ सह आर्म ॲक्ट ३/२५ नुसार जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक गजेंद्र इंगळे हे करीत आहेत.

# बिबट्याच्या हल्ल्यात मयत तरुणाच्या कुटुंबियांना २५ लाखांची मदत मंजूर

**खासदार निलेश लंके यांनी घेतली सांत्वनपर भेट, तातडीने मदत देण्याच्या अधिकाऱ्यांना सूचना**

पारनेर – पारनेर तालुक्यातील कळस गावातील गणेश तुळशीराम गाडगे या युवकाचा २ सप्टेंबर रोजीचे बिबट्याच्या हल्यात दुर्दैवी मृत्यू झाला. या दुःखद घटनेनंतर ८ सप्टेंबर रोजी खासदार निलेश लंके यांनी गाडगे कुटुंबीयांची कळस येथे जाऊन सांत्वन पर भेट घेतली. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती अतिशय हलाखीची असल्याने, वन विभागाच्या अधिकाऱ्यांशी तत्काळ चर्चा करून शासनाकडून तातडीची मदत मिळवून देण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.


बिबट्याच्या हल्ल्यात मयत झालेल्या कळस (ता.पारनेर) येथील गणेश गाडगे याच्या कुटुंबियांची भेट घेत सांत्वन करताना खा.निलेश लंके.

यास सकारात्मक प्रतिसाद देत संबंधित अधिकाऱ्यांनी एकूण २५ लाख रुपयांची आर्थिक मदत मंजूर केली असून, त्यापैकी १० लाख रुपये आरटीजीएस द्वारे कुटुंबाच्या खात्यात वर्ग करण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली. व उरलेली रक्कमही चार ते पाच दिवसात त्यांच्या खात्यात वर्ग करण्याचे कबूल केले. या कठीण प्रसंगी आपण सर्वांनी या कुटुंबाच्या पाठीशी उभं राहणं ही आपली सामाजिक जबाबदारी आहे असे खासदार निलेश लंकेनी सांगितले.

यावेळी मयत गणेश गाडगे यांचे बंधू दत्तात्रय शंकर गाडगे, जितेश सरडे, कोरठण विश्वस्त चंद्रभान ठुबे, सरपंच बाळासाहेब पुंडे, सरपंच श्रीकांत डेरे, सरपंच दिनेश चौगुले, सरपंच संतोष काटे, सरपंच दत्ता म्हस्के, सरपंच राहुल गाडगे, शुभम शिरोळे, सचिन साखला, किरण डेरे, जावेद कुरेशी, नरुभाई कुरेशी, गणेश जाधव, ग्रा पं सदस्य दत्तू गाडगे, निलेश लंके प्रतिष्ठान चे निघोज गटप्रमुख सुनीलराव गाडगे, कोरठण विश्वस्त भाऊसाहेब गाडगे, नारायण डोळस, गणेश पाडेकर, दीपक गाडगे, दत्तू वाघमारे, रंगनाथ वाघमारे, दिलीप गुंजाळ आदी उपस्थित होते.

# पाईपलाईन फुटल्याच्या कारणावरून तलवार, कोयते, सत्तूरने दोन गटात हाणामारी; ६ जखमी, गुन्हा दाखल

नगर – ओढ्यातील रस्त्यावरून जाणारी पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन फुटल्याने रस्ता खोदण्यावरून आणि मुरूम टाकण्याच्या कारणावरून दोन गटात तुफान हाणामारी झाल्याची घटना नगर तालुक्यातील निमगाव वाघा शिवारात निमगाव फाट्यावर ६ सप्टेंबर रोजी दुपारी ४.१५ च्या सुमारास घडली. यावेळी एकमेकांवर तलवार, कोयते, सत्तूरने वार करण्यात आले, तसेच लोखंडी रॉडनेही मारहाण करण्यात आली, यामध्ये ६ जण जखमी झाले असून दोन्ही गटाच्या १८ व ४-५ अनोळखी लोकांवर खुनाचा प्रयत्न केल्याचे २ वेगवेगळे गुन्हे नगर तालुका पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आले आहेत.

जखमींमध्ये एका गटाचे छबुराव राणुजी कांडेकर व निखील छबुराव कांडेकर (दोघे रा. हमीदपूर, ता.नगर) तर दुसऱ्या गटाचे दिलावर खलील शेख, अल्ताफ खलील शेख, इरफान रशीद शेख, अरबाज रफीक शेख (सर्व रा. शेख वस्ती, निमगाव वाघा, ता.नगर) यांचा समावेश आहे. याबाबत छबुराव कांडेकर यांनी दिलेल्या फिर्यादी वरून दिलावर खलील शेख, अल्ताफ खलील शेख, इरफान रशीद शेख, अरबाज रफीक शेख, सादिक मोहम्मद शेख, राजू रशीद शेख, सोहेल रशीद शेख, रशीद मोहम्मद शेख (सर्व रा. शेख वस्ती, निमगाव वाघा, ता.नगर), संदीप माधव खेसे (रा.जखणगाव, ता.नगर), संतोष माधव खेसे (रा. हमीदपूर, ता.नगर) यांच्या विरुद्ध बीएनएस कलम १०९, १८९ (२), १९१ (२), १९१ (३), १९०, ११५ (२), ३५२, ३५१ (२) (३), ३ (५), १२६ (२), आर्म ॲक्ट ४/२५, मुंबई पोलिस अधिनियम ३७ (१) (३) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तर दिलावर खलील शेख (रा. शेख वस्ती, निमगाव वाघा, ता.नगर) यांच्या फिर्यादी वरून छबुराव राणुजी कांडेकर, निखील छबुराव कांडेकर, किरण छबुराव कांडेकर, राहुल गणेश कांडेकर, बाळासाहेब कांडेकर, सुजित कांडेकर व ३ ते ४ अनोळखी इसम (सर्व रा. हमीदपूर, ता.नगर) तसेच योगेश पिसे व रवि नरवडे(दोघे रा. टाकळी खातगाव, ता.नगर) यांच्या विरुद्ध बीएनएस कलम १०९, १८९ (२), १९१ (२), १९१ (३), १९०, ११५ (२), ३५२, ३५१ (२)(३), ३ (५), १२६ (२), आर्म ॲक्ट ४/२५, मुंबई पोलिस अधिनियम ३७ (१)(३) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या दोन्ही गुन्ह्यांचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक उमेश पतंगे हे करीत आहेत.

संकष्ट चतुर्थी
उपवासासाठी स्पेशल
बुधवार दि.१० सप्टेंबर
चंद्रोदय ०८.२६ मि.
टक्कर मलाई लस्सी
कैलास उडपी लस्सी
शाखा नं. १ : शिवशक्ती अपार्टमेंट, खिस्त गल्ली, चितळे रोड, अहिल्यानगर.
शाखा नं. २ : तहसील कार्यालया समोर, टीव्ही सेंटर, सावेडी, अहिल्यानगर.
शाखा नं. ३ : पद्मावती पेट्रोल पंपाजवळ, नगर मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर.

फ्लेक्स प्रिंटींग
9403232323

पुरुषांसाठी ब्रॅण्डेड प्रीमियम क्वालिटी जिन्स व फॉर्मल पॅन्टस्
(साईज 28 ते 40 पर्यंत) Rs.300/- पासून Rs.800/- पर्यंत
(साईज 28 ते 40 पर्यंत) Rs.300/- पासून Rs.500/- पर्यंत
ब्रॅंडेड शर्ट साईज M पासून 7XL पर्यंत Rs.200/- पासून Rs.500/- पर्यंत
मर्यादित स्टॉक
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल
पुरुषांसाठी सर्व काही शुभ मॉल
मयुरी लेडिज मॉलच्या वर
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर ९०२८०११९८८

DCM SHRIRAM
Growing with trust
Fenesta
Better by Design
भारताची नंबर 1 खिडक्यांचा आणि दरवाजांचा ब्रॅंड
uPVC | Aluminium | Doors | Façades
आता अहिल्यानगर (अहमदनगर) मध्ये आहे.
CHANDAN GLASS
Shop No. 5, Venkatesh Prime, Near Anand Dham, Ahilya Nagar.
Call: 9860119223 / 9823189592

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# नगरमध्ये २३ सप्टेंबर रोजी विभागीय डाक अदालत

नगर – पोस्टाच्या कार्यपद्धती विषयी किंवा कामकाजाबद्दल तक्रारींचे निवारण सहा आठवड्यांच्या आत झाले नसलेल्या तक्रारींच्या निवारणासाठी वरिष्ठ अधीक्षक डाकघर, हेड पोस्ट ऑफीस, दुसरा मजला अहिल्यानगर यांच्या कार्यालयात २३ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता विभागीय डाक अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे.

या डाक अदालतीमध्ये टपाल, स्पीड पोस्ट, काऊंटर सेवा, डाक वस्तू, पार्सल, बचत बँक व मनी ऑर्डर बाबतच्या तक्रारी विचारात घेतल्या जाणार आहेत. तक्रारीमध्ये ज्या अधिकाऱ्यास मूळ तक्रार पाठविली असेल त्या अधिकाऱ्यांचे नाव, हुद्दा व पाठवल्याचा दिनांक नमूद करुन १७ सप्टेंबर पर्यंत अर्ज दोन प्रतींमध्ये सादर करावेत. एका अर्जासोबत एकच तक्रार दाखल करावी. अदालतीस तक्रारदारास स्वखर्चाने यावे लागेल. त्यासाठी कुठलाही भत्ता दिला जाणार नसल्याचे वरिष्ठ अधीक्षक, डाकघर, अहिल्यानगर यांनी कळविले आहे.

# शिक्षक पात्रता परीक्षा संदर्भात सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा पुनर्विचार करावा

नगर – १ सप्टेंबर २०२५ रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार जिल्हा परिषद, नगरपरिषद, नगरपालिका, महानगरपालिकांमधील अनुदानित, अंशतः अनुदानित व विनाअनुदानित शाळांतील शिक्षकांना शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) उत्तीर्ण करणे अनिवार्य केले आहे. पहिली ते आठवीपर्यंतच्या वर्गांना शिकवणाऱ्या शिक्षकांनी पुढील दोन वर्षांत टीईटी उत्तीर्ण न झाल्यास सक्तीने सेवानिवृत्ती घ्यावी लागणार असून, पाच वर्षांपेक्षा कमी सेवाकाल असलेल्या शिक्षकांना पदोन्नतीसाठी टीईटी उत्तीर्ण होणे बंधनकारक ठरणार आहे. या निर्णयामुळे देशभरातील शिक्षकांमध्ये संभ्रम व भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षक भारती संघटनेने ऑनलाइन सभा घेऊन सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश भूषण गवई यांना पत्राद्वारे निर्णयाचा पुनर्विचार करण्याची मागणी करण्याचे सर्वानुमते ठरविले.

बैठकीत बोलताना ज्येष्ठ समाजवादी नेते व माजी शिक्षक आमदार कपिल पाटील यांनी सदर निर्णयामुळे लाखो शिक्षकांवर अन्याय होणार असून, सर्वोच्च न्यायालयाने या संदर्भात पुनर्विचार करणे अत्यावश्यक आहे असे प्रतिपादन केले. त्यानुसार न्यायालयाला पत्र लिहिण्याचा निर्णय घेण्यात आला.

शिक्षक भारतीचे अध्यक्ष अशोक बेलसरे यांनी या निर्णयाविरोधात राज्यातील सर्व शिक्षकांमध्ये जागृती निर्माण करून राज्यव्यापी मोहिम राबवण्याचे आवाहन केले.

कार्याध्यक्ष सुभाष मोरे यांनी शिक्षण हा सामाईक सुचीतील विषय आहे. त्यामुळे राज्य शासनाने सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय बंधनकारक न करता राज्यातील शिक्षकांना दिलासा देणे आवश्यक आहे, असे स्पष्ट मत व्यक्त केले.

यावेळी शिक्षक भारती संघटनेचे विभागीय कार्याध्यक्ष महेश पाडेकर यांनीही या निर्णयाला विरोध दर्शवला. त्यांनी शिक्षकांवर अन्याय करणारा हा निर्णय आम्हाला मान्य नाही. शिक्षकांना न्याय मिळवून देण्यासाठी संघटनेतर्फे सर्वतोपरी प्रयत्न केले जातील, असे प्रतिपादन केले.

बैठकीत शिक्षक भारती संघटनेचे कार्याध्यक्ष सुभाष सावित्री किसन मोरे यांनी माहिती देताना सांगितले की, या निर्णयामुळे सेवेत असलेले लाखो शिक्षक असुरक्षिततेच्या छायेत आले आहेत. त्यामुळे या संदर्भात आम्ही सर्वानुमते ठरवलेला निवेदन पाठविले असून, शिक्षकांच्या न्यायासाठी संघटना ठाम राहील.


बैठकीत शिक्षक भारती संघटनेच्या राज्यातील सर्व विभागीय अध्यक्ष, राज्य सचिव सुनील गाडगे, विभागीय कार्याध्यक्ष महेश पाडेकर, उच्च माध्यमिक विभागाचे जिल्हाध्यक्ष रामराव काळे, महिला जिल्हाध्यक्षा रूपाली कुरुमकर, जिल्हा उपाध्यक्ष संजय तमनर, सचिन जासूद, दादासाहेब कदम, कोषाध्यक्ष गोपाळ दराडे, संघटक चंद्रशेखर हासे, सहसचिव राहुल कानवडे, तालुका अध्यक्ष सुमंत शिंदे, नरेंद्र लहिरे, साई थोरात, संपत वाळके, नानासाहेब खराडे, रूपालीताई बोरुडे, मफीज इनामदार, दीपक फापाळे, गणपत धुमाळ, विजय पांडे, अमोल तळेकर, संतोष नवले, बाबासाहेब तांबे, अकील फकीर, बाबाजी लाळगे, वैभव चोथे, प्रवीण मालुंजकर, श्याम जगताप आदी पदाधिकारी यांनी एकजुटीने सहभाग घेत राज्यातील शिक्षकांवर आलेल्या संकटाचा सामना करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# ‘जून’ऐवजी ‘सप्टेंबर’मध्ये शिक्षक बदल्या; विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम होणार

## पुढील वर्षी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांच्या पटसंख्येत घट होण्याची दाट शक्यता

चिचोंडी शिराळ – सप्टेंबरमध्ये झालेल्या अचानक शिक्षक बदल्यांमुळे मुलांच्या शिक्षणावर नक्कीच परिणाम होईल, कारण शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला शिक्षकांचे स्थलांतर झाल्यास अध्ययनात खंड पडतो, शिकवण्याची पद्धत बदलते आणि त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर विपरीत परिणाम होतो. जूनमध्ये होणाऱ्या बदल्या या शैक्षणिक वर्षाला अनुकूल असतात, मात्र उशिरा होणाऱ्या बदल्यांमुळे विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होते. शिक्षकांच्या बदल्या आणि त्याचा विद्यार्थ्यांवर परिणाम: जूनमध्ये बदल्या का गरजेच्या असतात? शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला (मे अखेरीस बदल्या होणं गरजेचं असतं) त्यामुळे विद्यार्थ्यांना नवीन शिक्षकांसोबत शिकायला आणि अभ्यासात सातत्य ठेवता येते.

सप्टेंबरमध्ये बदल्या झाल्यामुळे अध्ययन प्रक्रियेत खंड होऊ शकतो. सप्टेंबरमध्ये बदल्या झाल्यास, नवीन शिक्षक जेव्हा शाळेत येतात, तेव्हा वर्षाचा बराच काळ निघून गेलेला असतो. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिकण्यात आणि अभ्यासक्रमात खंड पडतो. त्यामूळे शैक्षणिक वर्ष वाया जाण्याची भीती पालकांना असते.



त्यामुळे विद्यार्थ्यांचा अभ्यास आणि प्रगती थांबते, त्यामुळे संपूर्ण शैक्षणिक वर्ष वाया जाण्याची शक्यता असते.उशिरा होणाऱ्या बदल्यांमुळे शिक्षकही अस्वस्थ होतात. नवीन शाळेत रुजू होताना त्यांना नवीन वातावरणात जुळवून घ्यावे लागते, ज्यामुळे त्यांची कार्यक्षमतेवर परिणाम होतो. विद्यार्थ्यांना एका शिक्षकाकडून दुसऱ्या शिक्षकाकडे जावे लागते, ज्यामुळे त्यांच्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करता येत नाही आणि नवीन शिक्षकांशी जुळवून घेण्यात अडचणी येतात. बदल्या उशिरा झाल्यामुळे पालकांनाही चिंता वाटते की त्यांच्या मुलांच्या शिक्षणात काय फरक पडेल. या सर्व कारणांमुळे, जूनमध्ये बदल्या होणे महत्त्वाचे असते, ज्यामुळे शैक्षणिक प्रक्रियेत कोणताही व्यत्यय येत नाही आणि विद्यार्थ्यांचे भविष्य सुरक्षित राहते, असे अंबादास गोरे म्हणाले.

सप्टेंबरमध्ये झालेल्या अचानक शिक्षक बदल्यांमुळे मुलांच्या शिक्षणावर नक्कीच परिणाम होईल, कारण शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला शिक्षकांचे स्थलांतर झाल्यास अध्ययनात खंड पडतो, शिकवण्याची पद्धत बदलते आणि त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर विपरीत परिणाम होतो. जूनमध्ये होणाऱ्या बदल्या या शैक्षणिक वर्षाला अनुकूल असतात, मात्र उशिरा होणाऱ्या बदल्यांमुळे विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होईल.

जूनमध्ये बदल्या का गरजेच्या असतात? कारण शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला (मे अखेरीस किंवा जूनमध्ये) बदल्या झाल्यास नवीन शिक्षक लगेच रुजू होऊ शकतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना नवीन शिक्षकांसोबत शिकायला आणि अभ्यासात सातत्य ठेवता येत असल्याचे मयुरी गोरे (पालक) म्हणाल्या.

शिक्षकांमधील गोंधळ: उशिरा होणाऱ्या बदल्यांमुळे शिक्षकही अस्वस्थ होतात. नवीन शाळेत रुजू होताना त्यांना नवीन वातावरणात जुळवून घ्यावे लागते, ज्यामुळे त्यांची कार्यक्षमतेवर परिणाम होतो.

**विद्यार्थ्यांचे नुकसान :** विद्यार्थ्यांना एका शिक्षकाकडून दुसऱ्या शिक्षकाकडे जावे लागते, ज्यामुळे त्यांच्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करता येत नाही आणि नवीन शिक्षकांशी जुळवून घेण्यात अडचणी येतात.

**पालकांची चिंता :** बदल्या उशिरा झाल्यामुळे पालकांनाही चिंता वाटते की त्यांच्या मुलांच्या शिक्षणात काय फरक पडेल. या सर्व कारणांमुळे, जूनमध्ये बदल्या होणे महत्त्वाचे असते, ज्यामुळे शैक्षणिक प्रक्रियेत कोणताही व्यत्यय येत नाही आणि विद्यार्थ्यांचे भविष्य सुरक्षित राहते.

# वरिष्ठ महिला महाराष्ट्र फुटबॉल संघात राणी कदम व सुमैया शेख यांची निवड

नगर – अहिल्यानगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनच्या खेळाडू





राणी कदम व सुमैया शेख यांची वरिष्ठ महिला महाराष्ट्र फुटबॉल संघात निवड झाली आहे. कदम हिच्याकडे महाराष्ट्र संघाचे कर्णधारपद सोपविण्यात आले आहे. दोन महिला फुटबॉलपटूंची राज्यात झालेली निवड ही जिल्ह्याच्या दृष्टीने अभिमानास्पद व फुटबॉल खेळाला चालणा देणारी ठरली आहे.

राष्ट्रीय फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धा राजमाता जिजाबाई ट्रॉफी गुजरात येथे होणार असून, कदम व शेख या स्पर्धेत महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहेत. महाराष्ट्र संघासाठी आयोजित निवड शिबिरात अहिल्यानगर जिल्ह्यातून राणी कदम, सुमैया शेख व तनिषा शिरसूल या खेळाडूंना संधी मिळाली होती. त्यापैकी राणी कदम व सुमैया शेख अंतिम संघात स्थान मिळवण्यात यशस्वी झाल्या. या यशाबद्दल अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर, उपाध्यक्ष खालिद सय्यद, अमरजीतसिंग शाही, जोगासिंग मिन्हास, सचिव रोनप फर्नांडिस, सहसचिव व्हिक्टर जोसेफ, प्रदीप जाधव, खजिनदार रिशपालसिंग परमार, सहखजिनदार रणबीरसिंग परमार, सदस्य राजू पाटोळे, जोएब खान, महिला संघाचे प्रशिक्षक शशांक वाल्मिकी, व्यवस्थापक काजल वाल्मिकी तसेच सर्व पदाधिकारी, सदस्य, पालक, शाळा आणि क्रीडा संस्थांनी त्यांचे अभिनंदन करुन त्यांना स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# ठेकेदाराकडून सात हजारांची लाच मागितल्याप्रकरणी जि.प.बांधकाम विभागाच्या अभियंत्यावर गुन्हा दाखल

नगर – शासनाच्या निधीतून केलेल्या २ रस्त्यांच्या कामांची बिले काढण्यासाठी पुण्याच्या गुणवत्ता निरीक्षकांकडून एस क्यु एम अहवाल प्राप्त करून घेण्यासाठी शासकीय ठेकेदाराकडे ७ हजारांची लाच मागितल्याप्रकरणी जिल्हा परिषदेच्या सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभागातील श्रीगोंदा पंचायत समिती कार्यालयातील अभियंता प्रकाश निवृत्ती पाचनकर (रा. लक्ष्मीनगर, मांडवगण रोड, श्रीगोंदा) यांच्यावर नगर च्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुन्हा दाखल केला आहे.

गुन्हा दाखल झालेले अभियंता पाचनकर हे आता बांधकाम विभागातून निवृत्त झालेले आहेत. मात्र लाच मागणीची घटना पाचनकर हे सेवेत असताना १६ एप्रिल २०२५ रोजी घडली होती. शासकीय ठेकेदार असलेल्या तक्रारदार यांनी शासनाच्या निधीतून २ रस्त्यांची कामे केली होती. या कामांचे बिल काढण्यासाठी पुण्याच्या गुणवत्ता निरीक्षकांकडून एस क्यु एम अहवाल मिळणे आवश्यक असते. प्राप्त करून घेण्यासाठी अभियंता पाचनकर यांनी तक्रारदाराकडे दोन कामांचे प्रत्येकी ३५०० असे ७ हजार रुपये लाच मागितली. याबाबतची तक्रार लाचलुचपत विभागाच्या नगर येथील कार्यालयात करण्यात आली होती. या कार्यालयातील पथकाने लाच मागणी पडताळणी केली असता त्यांनी लाच मागत, ती स्विकारण्याची तयारी दर्शविली होती.

तक्रारदार आणि आरोपी यांच्यातील संभाषणाची ध्वनिमुद्रिका तयार करून ती नाशिक येथील एसीबी कार्यालयात सादर केली. तपासादरम्यान ध्वनिमुद्रिकेतील आवाजाची पडताळणी करण्यात आली असता, तो आवाज पाचनकर यांचाच असल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे ८ सप्टेंबर रोजी रात्री उशिरा पाचनकर यांच्यावर श्रीगोंदा पोलिस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलिस उपअधिक्षक अजित त्रिपुटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक छाया देवरे व पथकाने ही कारवाई केली आहे.



**असून अडचण नसून खोळंबा:** गुलमोहर रोडवरील मॉडर्न कॉलनी येथील ड्रेनेज काम होऊन ६ महिने झाले तरी ऐन रहदारीच्या ठिकाणी मोठे पाईप तसेच पडल्याने वाहतुकीस अडथळा येत आहे. रात्री अपघाताची शक्यता असल्याने ते पाईप मनपाने तातडीने उचलावे, अशी मागणी होत आहे. (छाया – विजय मते)

# तहसील कार्यालयात जप्त केलेल्या वाहनांचा १५ सप्टेंबर रोजी लिलाव

नगर – जप्त केलेल्या वाहनांच्या लिलावाचे १५ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता तहसील कार्यालय, कोपरगाव येथे आयोजन करण्यात आले आहे. इच्छुक व्यक्ती, संस्थांनी लिलावात सहभाग नोंदवण्याचे आवाहन तहसीलदार, कोपरगाव यांनी केले आहे.

तालुक्यात वाळू चोरी विरोधी पथकांनी गोदावरी पात्रातून अवैधरित्या गौणखनिजाचे उत्खनन करुन वाहतूक करत असताना जप्त केलेल्या वाहन मालकांविरुद्ध कार्यवाहीचे आदेश पारित करण्यात आले होते. परंतू वाहन मालकांनी दंडातील रक्कम शासन जमा न केल्याने या वाहन लिलावातून दंडात्मक रक्कम वसून करण्यात येणार आहे. लिलावातील अटी व शर्ती, लिलावात असलेली वाहने, लिलावात हातची किंमत आदीबाबतची माहिती तहसील कार्यालय, कोपरगाव येथील नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात आली असून अधिक माहितीसाठी तहसीलदार, कोपरगाव यांच्याशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असेही कळविण्यात आले आहे.

# शायर कमर एजाज यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – उर्दूचे शायर कमर एजाज औरंगाबादी (वय ८०) यांचे



वृद्धापकाळाने औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) येथे निधन झाले.

त्यांची उर्दू गझल ‘आईना’ ही खूपच प्रसिद्ध झाली. पत्थरो का नगर है बचा आईना, कर रहा है यही ईलतेजा आईना, देखकर लोग तुझको सवरने लगे, अपने किरदार को तू बना आईना या व अशा अनेक रचना त्यांनी सादर केल्या. मानवी जीवनाशी निगडित अनेक बाबींवर त्यांच्या रचना प्रसिद्ध आहेत. संजीदा शायरीचा जादूगर म्हणून त्यांना ओळखले जाते. मुशायरा कमिटी आयोजित श्रीरामपूरचा मुशायरा तसेच नगर येथील नगर व्यासपीठ व मखदूम सोसायटी यांच्यातर्फे आयोजित गणेश फेस्टिवलच्या अनेक मुशायऱ्यांमध्ये त्यांनी आपली हजेरी नोंदवली होती. औरंगाबाद येथील कब्रस्तान येथे त्यांचा दफनविधी झाला.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# १२, १४ मुले आणि १७ वर्षाआतील मुलींमध्ये विजय मिळवून श्री साई स्कूलची आघाडी

## ऊर्जा गुरुकुल विरुध्द श्री साई स्कूलचा बरोबरीत सुटलेला सामना ठरला लक्षवेधी, फिरोदिया शिवाजीयन्स इंटर स्कूल फुटबॉल स्पर्धा

नगर – फिरोदिया शिवाजीयन्स इंटर स्कूल फुटबॉल स्पर्धेत सोमवारी (दि.८ सप्टेंबर) १२, १४ मुले आणि १७ वर्षा आतील मुलींमध्ये श्री साई स्कूलने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करुन विजय मिळवला. तर १२ वर्ष वयोगटात तक्षिला, १६ वर्ष वयोगटात ज्ञानसंपदा स्कूलने देखील विजय संपादन केले. १६ वर्ष वयोगटातील ऊर्जा गुरुकुल विरुध्द श्री साई स्कूल मधील बरोबरीत सुटलेला सामना अत्यंत रोमांचक राहिला. १४ वर्ष वयोगटातील सामन्यात श्री साई स्कूलच्या आरुष भावे याने गोलची हॅट्रीक केली.

सकाळच्या सत्रात १२ वर्ष वयोगटात (मुले) तक्षिला स्कूल विरुध्द ज्ञानसंपदा स्कूलमध्ये झालेल्या सामन्यात तक्षिला स्कूलने २-० गोलने विजय मिळवला. यामध्ये तक्षिला संघाकडून सिध्दार्थ प्रजापती व अभिनव मोरे यांनी प्रत्येकी १ गोल केले.

१६ वर्ष वयोगटात (मुले) ज्ञानसंपदा स्कूल विरुध्द अशोकभाऊ फिरोदिया स्कूलमध्ये झालेल्या सामन्यात ज्ञानसंपदा स्कूलने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करुन ६-० गोलने एकहाती विजय मिळवला. प्रतिस्पर्धी संघाला एकही गोल करता आला नाही. यामध्ये



ज्ञानसंपदाचे खेळाडू मोक्ष गरदास, कृष्णा भिसे, शुभम सानप, सिध्देश पवार, हर्षवर्धन साठे, श्रेयस पालवे यांनी प्रत्येकी १ गोल केला.

१७ वर्षा आतील मुलींमध्ये ऊर्जा गुरुकुल विरुध्द श्री साई स्कूलमध्ये अटातटीचा सामना रंगला होता. यामध्ये निकिता रामावत हिने १ गोल करुन श्री साई स्कूलला ०-१ गोलने विजय मिळवून दिला.

दुपारच्या सत्रात १२ वर्ष वयोगटात (मुले) ऊर्जा गुरुकुल विरुध्द श्री साई स्कूलमध्ये झालेल्या सामन्यात ऊर्जा गुरुकुलने २-० गोलने विजय मिळवला. यामध्ये लव्य पटेल व समर्थ महीन यांनी प्रत्येकी १ गोल केला.

१६ वर्ष वयोगटात (मुले) ऊर्जा गुरुकुल विरुध्द श्री साई स्कूल मधील सामना अत्यंत रोमांचक राहिला. शेवटच्या क्षणापर्यंत हा सामना रंगला होता. ऊर्जा गुरुकुल कडून स्वराज आडेप व श्री साई स्कूलकडून दिग्वीजय पुरीबुवा यांनी प्रत्येकी १ गोल करुन सामना बरोबरीत ठेवला. दोन्ही संघट आघाडी घेण्यासाठी शेवट पर्यंत झुंजले.१-१ गोलने हा सामना बरोबरीत सुटला.

१४ वर्ष वयोगटात (मुले) नालंदा स्कूल विरुध्द श्री साई स्कूल मध्ये झालेल्या सामन्यात ०-४ गोलने श्री साई स्कूलने विजय मिळवला. यामध्ये आरुष भावे याने ३ व सुवंश पूजारी याने १ गोल करुन आपल्या संघाला विजय मिळवून दिला.



शिक्षक दिनानिमित्त शिक्षक गौरव सोहळ्यात शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात कामाबद्दल सौ. नीता लोकेश बर्वे यांना सन्मानित करताना रयत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.ज्ञानदेव म्हस्के, शुभांगीताई पाटील, न्यू आर्ट्स कॉमर्स ॲण्ड सायन्सचे माजी मुख्याध्यापक डॉ. भास्करराव झावरे, माजी नगरसेवक योगीराज गाडे आदि.



ॲड. सतीशचंद्र सुद्रिक यांनी उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तसेच राज्यभर सेशन ट्रायल या विषयावर व्याख्याने देऊन जिल्ह्याचा लौकिक वाढविला आहे. त्यांच्या या कार्याचा गौरव म्हणून, उच्च न्यायालयाच्या खंडपीठाच्या न्यायाधीश श्रीमती विभा कणकणवाडी व नगरच्या प्रधान जिल्हा न्यायाधीश श्रीमती अंजू शेंडे यांच्या उपस्थितीत राहुरी बारतर्फे नुकताच त्यांचा सत्कार करण्यात आला.

# गृहिणी

## आरोग्य

पावसाळ्यात आरोग्याची विशेष काळजी घ्यावी लागते. अनारोग्य निर्माण करणारे, उघड्यावरचे पदार्थ खाल्ल्याने जंतुसंसर्ग, ताप यासारख्या तक्रारी निर्माण होतात. त्यामुळे या दिवसांत काही पदार्थ टाळले पाहिजेत. या दिवसांत सलाड खाणे टाळावे. कापल्यानंतर फळे लगेच खावीत. हवेशी संपर्क झाल्याने फळांमध्ये बॅक्टेरियाची वाढ होते.

## पाककला

### नायलॉन पोह्यांचा चिवडा

**साहित्य :** अर्धा किलो नायलॉन पोहे, १ कप भाजून सोललेले दाणे, अर्धा कप खोबऱ्याचे अतिशय पातळ काप, १ कप डाळ, ६-७ हिरव्या मिरच्या, कढीलिंबाची अर्धा कप पाने धुऊन, पुसून, चिरून, मीठ, पिठीसाखर, जिरेपूड, नेहमीची जास्त हिंग घातलेली फोडणी, थोडे साजूक तूप.

**कृती :** पूर्वतयारी करून ठेवा. हे पोहे फार नाजूक असतात. म्हणून शक्यतो, मायक्रोवेव्हमध्ये भाजून घ्या. खोबरे, दाणे, डाळं तळून घ्या. तुपाची फोडणी बनवून त्यात मिरच्या, कढीलिंब परता. पोहे, डाळ, दाणे, खोबरे, जिरेपूड, मीठ, साखर इ. घालून चांगले ढवळून घ्या. (गॅस बंद ठेवा) गार झाल्यावर डब्यात भरा.

## वास्तू

* जेवणाच्या खोलीच्या दरवाजावर फुलांचे चित्र लावावे. शेजाऱ्यांच्या घराकडून येणाऱ्या घातक प्रभावांपासून वाचण्यासाठी विंडचाईम किंवा वेली लावाव्यात.

* झोपण्याच्या खोलीत नेहमी सुंदर, कलात्मक व हसणाऱ्या बाळाची प्रतिमा लावा.

* जेवणाच्या खोलीचा रंग शांत आणि शीतलता प्रदान करणारा असावा.

* च्युइंगम चावल्याने मानसिक क्षमतेत पन्नास टक्के इतका फायदा होऊ शकतो. याने आपला हार्ट रेट वाढतो आणि या कारणाने रक्ताचा असरही वाढतो. यामुळे मेंदूतील ऑक्सिजनचे प्रमाण वाढते. यामुळे स्मरणशक्तीमध्ये अधिक फायदा होतो.

## सल्ला

* बटाटे आणि कांदे एकत्र ठेवल्यास बटाटे लवकर खराब होतात.

* आले स्वच्छ करून फ्रिजरमध्ये ठेवल्यास अधिक काळ टिकते. तसेच सहज चिरता व किसता येते.

* सर्दी-पडसे झाल्यास मोहरी पूड थोडी मध घालून चाटावे. लवंगतेल हुंगावे.

* ओवा भाजून मीठ मिसळून खाणे. हळद पूड, गूळ, हिंगपूड मिसळून वरचेवर चिमुटभर खावे.

## सौंदर्य

चेहरा रुक्ष असेल तर २ चमचे ताजी मोहरी वाटून त्यात १ चमचा दूध व चिमटूभर हळद मिसळून पेस्ट बनवून लावा व १० मिनिटांनंतर चेहरा धुवा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. १० सप्टेंबर २०२५

**संकष्ट चतुर्थी, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, भाद्रपद कृष्णपक्ष, रेवती १६।०३, सूर्योदय ०६ वा. ३१ मि. सूर्यास्त ०५ वा. ३२ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : नवीन मित्रांच्या ओळखी होतील. भविष्यात त्यांचा उपयोग होईल. सरकारी कामे सफल होतील. व्यवसाय क्षेत्रात अधिकारी व सहकारी नकारात्मक वागतील.

**वृषभ** : आपल्या सहकार्यांबरोबर झालेल्या मतभेदांचे निराकरण करण्याचा प्रयत्न करा. अधिकार क्षेत्रात वाढ होईल. गृहिणी आज असंतुष्ट राहतील.

**मिथुन** : मोठ्यांचा सहवास लाभेल, त्यांना भेटून आनंद होईल. दूर किंवा विदेशात असलेल्या संततीच्या शुभवार्ता मिळतील. खाण्यापिण्याकडे लक्ष द्या.

**कर्क** : विशेषतः धंदा-व्यवसाय करणाऱ्यांना आज फारच लाभदायक दिवस आहे. मित्राच्या भेटीतून आनंद मिळेल. अजीर्णचा त्रास संभवतो. साहित्य, लेखन यात रस वाटेल.

**सिंह** : भेटीचे योग येतील. अचानक धनलाभ संभवतो. प्रवास होतील. काम करायला उत्साह वाटणार नाही. मित्र व स्नेही भेटल्यामुळे आनंदात असाल.

**कन्या** : रागावर आज संयम ठेवावा लागेल. खर्च अधिक होईल. कुटुंबियांबरोबर संघर्ष होणार नाही याकडे लक्ष द्या. कौटुंबिक वातावरण त्रासदायक राहील.

**तूळ** : आज नवीन कामे सुरू करू नका. नवे परिचय सुद्धा लाभदायी होणार नाहीत. सरकार विरोधी कारवायांपासून दूर राहणच आज फायदेशीर होईल.

**वृश्चिक** : शारीरिक व मानसिक स्वास्थ्य लाभेल. आर्थिक लाभ होईल. आजारी व्यक्तीच्या प्रकृतीत सुधारणा होईल. मातेचे स्वास्थ्य बिघडू शकते.

**धनु** : प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळवाल. चर्चा- वादविवाद यातही तुमचा प्रभाव राहील. कष्टाच्या मानाने यश संतोषजनक नसेल. धन आणि किर्तीची हानी होईल. प्रतिस्पर्ध्यांपासून सावध राहा. आरोग्याची काळजी घ्या.

**मकर** : हा वेळ आपल्या एखाद्या आवडीच्या व्यक्तीबरोबर घालवू शकता. आपल्या सर्जनशील व कलात्मक वैशिष्ट्यांना प्रेरणा मिळेल.


**कुंभ** : आपल्या जुन्या लोकांना किंवा आधार देणाऱ्या मित्रांना जोडणे यावेळी आपल्यासाठी फलदायी आहे. कामात सांभाळूनच पुढे चला. कोर्ट कचेरीपासून दूरच राहा.

**मीन** : जोखिम असलेल्या कार्यांमध्ये गुंतवणूक करू नये. राजकीय विषयांमध्ये स्थिती सुखद राहील. सांसारिक किंवा इतर प्रश्नांमुळे मन उदास राहील.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# शब्दगंध क्र. ७२५९

सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७२५८ चे उत्तर



**आडवे शब्द :-** उद्यान, बगीचा, उपवन ३) तोरा, रुबाब, ऐट ६) चिनी मातीच्या भांड्यात पाणी घालून त्यातून सप्तस्वर काढणारे वाद्य ८) माय, आई, जननी ९) सोटा, काठी १०) असंख्य, अगणित, अनंत ११) एक विषम संख्या १२) उत्तर आणि पूर्व यामधील दिशा १४) बीज, बियाणे १५) एक पक्षी, बगळा १८) वाळवंटी देशांचा समूह १९) तोंडाने म्हटलेली उजळणी २०) नवीन, नूतन २१) ऊस, फळ वगैरेतील द्रव, स्वाद २२) कडक, निबर

**उभे शब्द :-** १) पलंग, खाट २) जहाज, तारू, होडी ३) उशीर, विलंब ४) ठावठिकाणा, तपास, शोध ५) रागाचा आवेश, अतिराग ७) किनारा, बाजू, निकाल, फैसला, अखेर ८) आईचा भाऊ, मातुल १०) दुसरा, निराळा, भिन्न ११) एक किमती लाकूड व त्याचे झाड १३) शौर्याचे गाणे रचून ते गाणारा १५) जम १६) दयाशील, कृपाळू १७) चारही कोन नव्वद अंशाचे व चारही बाजू समान असा चौकोन १८) विलक्षण, अद्‌भूत १९) पंख, दुसरा

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : दुसऱ्यांना मारण्यात पराक्रम नाही; पण स्वतः मरण्यात आहे. कोणाची प्रतिष्ठा नष्ट करण्यात पराक्रम नसून, ती बचावण्यात आहे.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### कुरुप म्हणजे काय?

कुरुप म्हणजे आपल्या कातडीला पडलेला जाड चट्टा होय. हातापायाच्या बोटांना किंवा टाचेला वगैरे असे कुरुप होतात. बोटे जेथे एकमेकांना घासतात त्या जागी किंवा चप्पल, बूट यांचा पायावर जास्त दाब पडतो त्या जागी कुरुपं येतात. काही वेळा कुरुपांमुळे खूप दुखते.

कुरुपं फार दुखत असतील, तर त्यावर उपचार करावेच लागतात. कुरुपावर घासतील किंवा दाब देतील अशा प्रकारची पादत्राणे न वापरणे महत्त्वाचे ठरेल. टाचेला कुरुप असल्यास पादत्राणे वापरताना टाचेखाली कापूस किंवा मऊ कापडाच्या घड्या ठेवाव्या. कुरुपं कमी दुखावी यासाठी पाय गरम पाण्यात १५ मिनिटं बुडवावे. छोटी कानस किंवा काटेरी ब्लेड घेऊन कुरुपाचे थर कापून टाकावे व चट्ट्याची जाडी कमी करावी. या उपायांनी दुखणे कमी होईल.

कॉर्नप्लास्टसारख्या पट्ट्या लागोपाठ ३ दिवस वापरून कुरुपं कमी होऊ शकतात. कधी कधी शस्त्रक्रियेने कुरुपं काढून टाकावी लागतात. अर्थात शस्त्रक्रियेनंतरही पुन्हा कुरुपं तयार होऊन त्रास होऊ शकतो. होमिओपॅथिक औषधांनी कुरुपं कमी होतात असा अनेकांचा अनुभव आहे. तेव्हा होमिओपॅथिक डॉक्टरांचा सल्ला घेणे श्रेयस्कर ठरेल.

### सिंह आणि कोल्हा

एका रानात एक सिंह राहत होता; पण बरेच प्रयत्न करूनही त्याला शिकार मिळत नव्हती. भुकेने कासावीस झाला असता त्याने मनात काही विचार केला. त्याने रानात आपण फार आजारी आहोत अशी बातमी पसरेल, अशी व्यवस्था केली. थोड्याच दिवसांनी सिंह महाराज आजारी असल्याचे सर्व प्राण्यांच्या कानावर गेले.

महाराजांच्या समाचाराला गेले पाहिजे; नाहीतर त्यांची आपणावर खप्पा मर्जी होऊन त्यांच्या रोषाला बळी पडावे लागेल, असा विचार करून रानातले अनेक प्राणी सिंह महाराजांच्या गुहेत गेले. अशा प्रकारे अनेक दिवस रानातले अनेक प्राणी महाराजांच्या समाचारासाठी गुहेत जात होते.

रानातले सर्व प्राणी आले; पण अजून कोल्होबा कसे आले नाहीत, असा विचार सिंह महाराजांच्या मनात येताच एके दिवशी याची चौकशी करण्यासाठी त्यांनी लांडगेदादाला कोल्ह्याकडे पाठविले.

तेव्हा लांडगेदादा चौकशी करण्यासाठी कोल्होबाकडे आला आणि म्हणाला, ''अरे कोल्होबा, आपले सिंह महाराज फारच आजारी आहेत. रानातले सर्व प्राणी त्यांच्या समाचारासाठी आले. मग तुम्ही का बरे आला नाहीत? याची चौकशी करण्यासाठी महाराजांनी मला तुमच्याकडे पाठविले आहे. मग बोला, कधी येता समाचाराला?''

त्यावर कोल्होबा म्हणाले,

''अरे लांडगेदादा, सिंह महाराजांना माझा नमस्कार आणि शुभेच्छा सांगा. त्याचबरोबर त्यांना माझी एक विनंतीही कळवा की, ''महाराजांवर माझे पूर्वीइतकेच प्रेम आणि निष्ठा आहे. त्यात कसलाही बदल झाला नाही. त्यांच्यावर माझे पूर्वीइतकेच प्रेम आहे आणि पुढेही राहील.

महाराज आजारी पडल्याची खबर मलाही कळली. त्यांची विचारपूस करण्यासाठी जावे, असे मलाही मनापासून वाटते. पण माझ्या मनात काही कुशंका येतात. त्यांची गुहा नजरेस पडताच माझ्या अंगाचा थरकाप उडतो. आजपर्यंत रानातले जे जे प्राणी महाराजांच्या समाचाराला गुहेत गेले, ते अजूनपर्यंत तरी बाहेर आलेले दिसले नाहीत. असे असता मला गुहेत जाऊन महाराजांची विचारपूस करण्याचे धाडस होत नाही. असे आपण महाराजांना कळवा, म्हणजे झाले.''

**तात्पर्य** : कोणी एखादा लबाड माणूस आपले मतलब साधण्यासाठी काही तरी खोटी-नाटी अफवा पसरवतो. या त्याच्या भूलथापांना बळी पडणे, हे मूर्खपणाचे लक्षण होय.

# जीवन का अमृत (भाग १)



हंस दूध और पानी को अलग-अलग कर देता है; दूध को पी लेता है और पानी को छोड़ देता है, उसमें discrimination (भेद पहचानने) की शक्ति है कि अच्छा क्या है और बुरा क्या है। उस हंस को मालूम है और वह अच्छाई की तरफ़ ही चलता जाता है। लेकिन यहाँ पर बाबा फरीदने एक और प्रतीक इस्तेमाल किया है, कौए का। वह क्या करता है ? कां-कां करता है। किसी को उसकी आवाज़ अच्छी नहीं लगती और उड़ता है तो मुर्दों की ओर भागता है, कीड़े-मकोड़ों को खाता है और रंग उसका काला है, तो वह गंदगी से भरपूर है। जो कोयल है, वह अमृत के समान मीठा गाती है। उसकी मधुर आवाज़ से हम लोग आकर्षित होते हैं। फल और फूलों के ऊपर वह बैठती है और वहाँसे अपने लिए खाना लेती है। कोयल का रंग भी काला है। लेकिन उसका रंग काला क्यों है ? यह अगली लाइन में, कोयल की तरफ से जवाब दे रहे हैं :

## गुरू और परमात्मा

**अपने प्रीतम के हउ बिरहै जाली ॥**

मैं अपने प्रीतम के वियोग में काली हो गई हूँ। कैसे काली हो गई! जल-जल कर काली हो गई। अपने प्रीतम से अलग रहकर उसकी याद में, उससे मिलने के लिए, उसकी तड़प में, मैं जल-जल कर काली हो गई हूँ। जो कौआ है, वह काला क्यों हुआ है ? वह गन्दगी में रहता है और गन्दगी के रंग में वह रंगा हुआ है, लेकिन कोयल काली इसलिए हुई है क्योंकि उसके अन्दर प्रीतम से मिलने की तड़प है।

इस प्रतीक के ज़रिये बाबा फ़रीद हमें समझा रहे हैं कि हमारी जिंदगी एक कौए के माफिक है। इसलिए कौए ज़्यादा दिखाई देते हैं, मगर कोयल बहुत कम। हम लोग इस दुनिया की गन्दगी में लगे हुए हैं और इस दुनिया की गन्दगी का कालापन हम पर चढ़ा जा रहा है। कोयल को वे एक महापुरुष के रूप में हमें दर्शा रहे हैं; एक ऐसा महापुरुष जो प्रभु की याद में हर समय रहता है। उसके द्वारा वे हमें समझा रहे हैं कि हमें भी एक कोयल के माफ़िक बनना है। यह सारा शब्द हमें बार-बार यही समझाता है कि हम एक ऐसे इंसान बनें, जो प्यार से भरपूर हो, प्रभु के प्यार से भरपूर हो। जब इंसान प्रभु के प्यार से भरपूर होगा, तभी उसमें भक्ति का भाव होगा। जब कोयल को हम देखते हैं, तो कोयल क्या करती है ? वह अपने अंडे, जहाँ कौए के अंडे होते हैं, उन्हीं में जाकर मिला देती है क्योंकि उसको यकीन है कि वहाँ बच्चे ठीक-ठाक रहेंगे। ऐसा यक़ीन हमें तभी आता है जब कि हमारी लगन प्रभु की ओर हो। जितने भी महापुरुष आये हैं, उन सबने अपने शब्दों में हमें यही समझाया है कि हमारा असली रूप हमारी रूह है, हमारी आत्मा है, उसे परमात्मा से मिलना है। किस तरीके से मिलना है, वे तरीके महापुरुष हमें बताते चले आये हैं।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

## आज्ञा चक्र

इसके ऊपर ४ किलो देशी गाय का गोबर, १५० ली. पानी में मिलाकर छिड़काएं। इसके ऊपर खेती में से ५०-६० किलो मिट्टी, समान रूप से आच्छादित करें और मिट्टी गीली होने तक पानी छिड़काएं। यह एक थर (स्तर) पूरा हो गया अब ऐसे ही इसके ऊपर और थर चढ़ाएँ और चेम्बर के ऊपर डेढ़ फुट ऊंचाई तक भरते चलें। चेम्बर भरने के बाद ४००-५०० किलो मिट्टी गीली बनाकर ३ ईंच जितनी मोटी साइज का लेप चढ़ाएँ और ऊपर से गोबर का लेप चढ़ाएँ। धूप से मिट्टी फट जाती है तो इसे गोबर के पानी से पैक करें। ज्यादा धूप हो तो ऊपर से वेस्ट मटेरियल से आच्छादित करें। ९० से १२० दिनों में कम्पोस्ट खाद तैयार हो जायेगी। इस खाद को सूखने न दें। २० प्रतिशत गीला रहने दें।

इसमें ३.५ से ४ टन कम्पोस्ट मिलता है। इस खाद में ०.५% से १ प्रतिशत नायट्रोजन, ०.५% से ०.८ प्रतिशत स्फुरद और १.२% से १.४% पोटाश मिलता है।

केंचुएं की खाद निर्माण करने की पद्धती

केंचुएं की खाद निर्माण करने के लिए छाँव की आवश्यकता है। सूर्यप्रकाश और बारिश से संरक्षण के लिए छप्पर (शेड) बनाकर उसके नीचे ३ फीट चौढ़ाई और ८ से १० फीट लम्बी जगह में डेढ़ फीट ऊँचाई की ४ इंच मोटी दीवार बनाकर चेम्बर बनाएं। पहले पानी जमीन पर छिड़ककर जमीन गीली करें। फिर पहले वेस्ट मटेरियल जैसे धान का भूसा, गेहूँ का भूसा, गन्ने के पत्ते इत्यादि जो जल्दी सड़ते नहीं है, ऐसे पदार्थों का १५ से २० सें.मी. मोटा थर बनाइये। इस पर पानी छिड़ककर गीला बनाएं। इसके ऊपर तैयार गोबर की खाद अथवा कम्पोस्ट खाद अथवा बगीचे की मिट्टी का ५ सें.मी. का थर लगाएँ। इससे केंचुएं सुरक्षित होते हैं। इसके ऊपर पूर्ण तैयार केंचुऐं छोड़ दें। प्रति १० स्क्वेयर फीट में २ हजार केंचुऐं छोड़ दें। इसके ऊपर बारदान से ढक देवें। ४० से ४५% गीलापन रहे इसकी सम्भाल रखें। शेड में २० से ३० डिग्री सेंटीग्रेड तापमान रखें। केंचुऐं की रक्षा के लिए अन्दर कोई कीट वा चींटी न आये इस पर भी ध्यान रखना जरूरी है। एक दो दिन में आवश्यकता अनुसार पानी छिड़काएं। ३०-४० दिन में पूरी तरह से केंचुऐं की खाद तैयार हो जायेगी। केंचुएं अलग करके खाद को जमीन गीली हो तब जमीन में मिलाएँ। प्रकृति में होनेवाले बदलावों को सहन करने की शक्ति और प्रहारों का सामना करने की शक्ति कुदरत ने सभी वनस्पति पेड़ों को दी हुई है। अगर जमीन शक्तिशाली है तो वनस्पति भी शक्तिशाली बनती है। उनकी रोग प्रतिकारक शक्ति बढ़ती है। कोई भी कीट या फफूंदी जैसी बीमारी आयेगी तो भी वह ठहरेगी नहीं। लेकिन जमीन शक्तिशाली नहीं होगी तो वनस्पति कमजोर बनती है और कीट तथा बीमारी को वनस्पतियाँ प्रतिकार नहीं कर पाती हैं इसलिए कीट प्रतिबंध दवाइयों का इस्तेमाल करना पड़ता है।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

आज गण्याने कमालच केली
पुन्हा बँकेत जाऊन झोपला
कारण
तिथे लिहिले होते की 'यहाँ सोने पर लोन मिलता है'

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* शांघाई सहकार्य संघटनेचे महासचिव पदी कोणाची नियुक्ती झाली?
– झाँग मिंग

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आरोग्य सखी

शक्यतो जेवण ताजे व गरम असावे. पालक, माठ, चाकवत, राजगिरा, तांदूळजा अशा भाज्या खाव्यात. टोमॅटो, गाजर, बीटची कोशिबीर व जीवनसत्त्वे, प्रोटीन्सयुक्त आहार घ्यावा. दूध, कडधान्य, फळे, भाज्या यांचा आहारात समावेश करावा.

**विहार :** रज:स्वलेने या पाच दिवसांमध्ये आपले मन प्रसन्न ठेवावे. सकारात्मक विचारांमध्ये मन गुंतवावे. शोक करणे, रडणे, अति श्रमाची कामे टाळावीत. कारण अति कामामुळे रक्तस्रावाचे प्रमाण वाढते व थकवा येतो. दिवसा झोपणे टाळावे. कारण त्यामुळे कफवृद्धी होऊन स्रोतसांमध्ये अडथळा निर्माण होतो. शरीरात आमनिर्मिती होते व त्यातून अनेक आजार जडतात. शरीराची स्वच्छता राखावी. सकाळी अंघोळ करावी व दर तीन-चार तासांनी सॅनिटरी पॅड बदलत राहावेत.

## आयुर्वेदीय आहार दृष्टीकोन

पाळीमध्ये योनिमार्ग रक्तस्रावामुळे नाजूक झाल्याने स्त्रीने लैंगिक संबंध ठेवू नयेत; नाही तर लैंगिक क्रिया वेदनामय होऊ शकते. आयुर्वेदामध्ये मासिक पाळीच्या काळात सांगितलेली पथ्ये स्त्रीच्या शारीरिक व मानसिक आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत हितकर आहेत. याचे व्यवस्थित पालन केले तर स्त्रीचे आरोग्य चांगले राहील.

मस्तिष्काच्या तळाशी पिट्युटरी ग्रंथी असते. त्यावर बीजकोषांचे कार्य अवलंबून असते. बीजकोषां मध्ये दर महिन्याला बीज तयार होऊन ते परिपक्व होणे व कोषातून बाहेर पडणे, इस्ट्रोजन आणि प्रोजेस्टेरॉन या दोन हार्मोन्स निर्मिती करणे या ग्रंथीच्या चालनेवर लवलंबून असते. तसेच फॉलिकल स्टिम्युलेटींग हार्मोन्स, ल्युटिनायसिंग हार्मोन्स आणि ल्युटिओट्रॅपिक हार्मोन्स तयार करणे हे देखील अवलंबून असते.

या ग्रंथीतून बाहेर पडणाऱ्या फॉलिक्युलर हार्मोन्समुळे बीज फुटून बाहेर पडते. त्यानंतर ते बीजनलिकेत येते. तेव्हा प्रोजेस्टेरॉन स्राव तयार होतो. त्यामुळे गर्भाशयाच्या आतील बाजूस एक अस्तर (Endmetrium) तयार होते. या अस्तराचा थर सतत कमी-जास्त होत असतो. या अस्तराचे कार्य म्हणजे गर्भधारणेला पोषक वातावरण तयार करणे होय. लैंगिक संबंध होऊन गर्भाशयमुखाजवळ पुरुषाचे वीर्य पडते. या वीर्यामधील काही शुक्रजंतू गर्भाशयात जाऊन बीजवाहिनी नलिकेपर्यंत पोहोचतात.

(क्रमशः)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# ईद-ए-मिलाद उत्साहात, हिंदू-मुस्लिम एकतेचे दर्शन

## विश्वशांतीसाठी प्रार्थना करून प्रसादाचे केले वाटप

नगर - नगर तालुक्यातील नेप्ती येथे गणपती उत्सवानंतर पोलीस प्रशासनाच्या आवाहनानंतर नाले हैदर यंग पार्टी व मुस्लिम बांधवांनी सोमवारी संपूर्ण जगाला शांतीचा आणि एकतेचा संदेश देणारे मुस्लिम धर्मियांचे धर्मगुरू हजरत मोहम्मद पैगंबर यांची जयंती विविध कार्यक्रमाने उत्साहात साजरी केली. यावेळी मुस्लिम बांधवांना हिंदू बांधवांनी ईदच्या शुभेच्छा दिल्या अशी माहिती रामदास फुले यांनी दिली.


ईद-ए-मिलाद निमित्त नेप्ती गावातील इमामबाडा येथे हिंदू-मुस्लिम बांधवांच्या वतीने स्वच्छता अभियान राबवून कार्यक्रम परिसर स्वच्छ व सुंदर केला.

ईद-ए-मिलाद निमित्त गावातील हिंदू-मुस्लिम लोकांनी एकत्रित येऊन धार्मिक एकतेचे दर्शन घडविले. कार्यक्रम परिसरात इमामबाडा येथे हिंदू-मुस्लिम बांधवांच्या वतीने स्वच्छता अभियान राबवून कार्यक्रम परिसर स्वच्छ व सुंदर केला. परिसरात झालर व पताका लावून आकर्षक विद्युत रोषणाई केली होती. यावेळी हिंदू-मुस्लिम एकतेचे दर्शन घडत होते. गावातील धार्मिक वातावरण ईदमय झाले होते. हा दिवस मुस्लिम बांधवांसाठी अतिशय खास आहे कारण या दिवशी इस्लाम धर्मियांचे सर्वात लोकप्रिय संस्थापक प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर यांचा जन्म झाला आहे. इस्लामच्या धोरणानुसार अल्लाहाकडे कुराण हा धर्मग्रंथ त्यांच्या मार्फत लोकांपर्यंत पोहोचला आहे.

ईद-ए-मिलाद निमित्त नाले हैदर यंग पार्टी व मुस्लिम बांधवांच्या वतीने इमामबाडा येथून गावातून मिरवणूक काढण्यात आली होती. या मिरवणुकीत हिंदू-मुस्लिम युवकांनी धार्मिक ध्वज, पताका हातात घेत जश्ने ईद मिलादुन्नवी जिंदाबाद, अल्लाहू अकबर अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला. गावातील चौका-चौकात ग्रामस्थांनी मिरवणुकीचे स्वागत केले. अतिशय उत्साही वातावरणात शांततेत मिरवणूक गावातून फिरून आल्यानंतर इमामबाडा येथे मिरवणुकीची सांगता झाली. यावेळी मुस्लिम बांधवांना हिंदू बांधवांनी ईदच्या शुभेच्छा दिल्या. ग्रामस्थांमध्ये प्रसादाचे वाटप करण्यात आले.

यावेळी मौलाना मुनीर सय्यद यांनी देशाच्या विकासासाठी व शांततेसाठी प्रार्थना केली. माजी जिल्हा परिषद सदस्य अरुण होळकर, सरपंच संजय जपकर, माजी उपसरपंच संजय आसाराम जपकर, जिल्हा नियोजन समितीचे सदस्य शिवाजीराव होळकर यांनी कार्यक्रम स्थळी येऊन मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी माजी उपसरपंच फारूक सय्यद, दादू चौगुले, बाबूलाल सय्यद, समता परिषद तालुकाध्यक्ष रामदास फुले, मार्केट कमिटीचे माजी संचालक वसंतराव पवार, प्रा. एकनाथ होले, मौलाना मुनीर सय्यद, अरबाज शेख, ग्रामपंचायत सदस्य बंडू जपकर, हुसेन सय्यद, व्हा. चेअरमन सादिक पवार, गुलाब सय्यद, नितीन पवार, बबन सय्यद, जावेद सय्यद, जमीर सय्यद, मेहबूब सय्यद, सादिक सय्यद, वाजीद सय्यद, मुक्तार सय्यद, नौशाद शेख, सिकंदर शेख, सलीम सय्यद, युनूस सय्यद, हन्सार सय्यद, कयूम सय्यद, उमर सय्यद, नावेद सय्यद, रमिज सय्यद, आदिल सय्यद, परवेज सय्यद, बादशाह सय्यद, रफिक सय्यद, मोईन सय्यद, आसिफ सय्यद, आसिफ शेख, एजाज सय्यद, हमीद सय्यद, नसीर सय्यद, अजर सय्यद, दानिश सय्यद आदींसह नाले हैदर यंग पार्टी, दोस्ती तरुण मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# हरिष आंधळे यांना राज्यस्तरीय 'युवक आधार समाजरत्न पुरस्कार'

नगर - समाजसेवेत उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल हरिष आंधळे यांना राज्यस्तरीय युवक आधार समाजरत्न पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. मुंबई येथे युवक आधार संस्थेमार्फत आयोजित कार्यक्रमात ज्येष्ठ अभिनेत्री माधवी जुवेकर व सहसंपादक विलास बडे यांच्या हस्ते आंधळे यांना सन्मानित करण्यात आले.



मुंबई पोलीस विभागात सेवा बजावत असलेले आंधळे हे मुंबई पोलिस को-ऑपरेटिव्ह बँकेचे खजिनदार म्हणूनही कार्यरत आहेत. त्यांनी टाटा कॅन्सर हॉस्पिटल समोर रुग्ण व त्यांच्या नातलगांसाठी अविरत अन्नसेवा पुरवून समाजकार्यात योगदान दिले आहे. विद्यार्थीदशेत असतानाच त्यांनी सामाजिक कार्याची वाट धरली होती. नगर तालुक्यातील युवकांना एकत्र आणण्यासाठी त्यांनी पवनपुत्र सामाजिक संघटनेच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवले. त्यामुळे युवकांमध्ये सामाजिक जाणिव व संघटितपणाची भावना निर्माण झाली.

या सन्मानामुळे हरिष आंधळे यांच्या सामाजिक कार्याचा केवळ गौरव झाला नाही, तर त्यांनी उभारलेला आदर्श हा तरुणांसाठी प्रेरणादायी ठरला आहे.


पुणे रोडवर दुर्वा प्युअर व्हेज हॉटेलचे उद्घाटन विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आमदार बबनराव पाचपुते तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून ह.भ.प. सुदाम गोरखे गुरुजी, खा. निलेश लंके, आ. संग्राम जगताप, आ.शिवाजीराव कर्डीले, आ. काशिनाथ दाते, डॉ. भाऊसाहेब दांगडे आदी उपस्थित होते.

# दुर्वा प्युअर व्हेज हॉटेलचा शुभारंभ

नगर - पुणे रोडवर दुर्वा प्युअर व्हेज हॉटेलचे उद्घाटन ५ सप्टेंबर रोजी विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी आमदार बबनराव पाचपुते तसेच प्रमुख उपस्थिती म्हणून ह.भ.प. सुदाम गोरखे गुरुजी, खा. निलेश लंके, आ. संग्राम जगताप, आ.शिवाजीराव कर्डीले, आ. काशिनाथ दाते, डॉ. भाऊसाहेब दांगडे आदी उपस्थित होते.

प्रशस्त डायनिंग रूम, स्वच्छ प्रसाधन गृह, मुबलक पार्किंगची सुविधा असलेल्या या हॉटेलमध्ये इंडियन, चायनीज, पंजाबी असे सगळ्या पद्धतीचे शाकाहारी खाद्य लोकांना चाखायला मिळणार आहेतच, तसेच 'शिपी आमटी' ह्या 'दुर्वा स्पेशल' सिग्नेचर डिशचाही आस्वाद घेता येणार आहे. त्याबरोबरच किटी पार्टी, मिटींग्स, स्नेहसंमेलनासाठी सुद्धा ही जागा नक्कीच सोयीची आहे. गार्डन रेस्टॉरंट हे हॉटेल दुर्वाचे प्रमुख आकर्षण आहे. त्यासोबतच इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग पॉईंट, ऑनलाईन सीएनजीची सोय प्रवाश्यांसाठी केली आहे.

प्रास्ताविक ॲड. शिवाजीराव अनभुले यांनी केले. अक्षय अनभुले यांनी आभार मानले.

# कौशल्य प्रशिक्षणातून युवकांना रोजगाराच्या संधी

## रविकुमार पंथम यांचे प्रतिपादन; एंजल वन सीएसआर फंडाच्या साहाय्याने राह फाउंडेशन व सेवा फाउंडेशनचा उपक्रम

नगर - पारंपरिक शिक्षणासोबत विविध कौशल्य आत्मसात केल्यास रोजगाराच्या उत्तम संधी उपलब्ध होतात. आजच्या युगात कौशल्यपूर्ण शिक्षण घेणे हेच यशस्वी करिअरचे खरे शस्त्र आहे, असे प्रतिपादन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन विभागाचे सहायक आयुक्त रविकुमार पंथम यांनी केले.


एंजल वन यांच्या सीएसआर फंडाच्या साहाय्याने राह फाउंडेशन व सेवा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने कौशल्य प्रशिक्षण उपक्रमांतर्गत शिक्षक दिनानिमित्त बॅच १५ व १६ च्या विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्र वितरणाचा कार्यक्रम झाला.

एंजल वन यांच्या सीएसआर फंडाच्या साहाय्याने राह फाउंडेशन व सेवा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात राबविण्यात येत असलेल्या कौशल्य प्रशिक्षण उपक्रमांतर्गत शिक्षक दिनानिमित्त ५ सप्टेंबर रोजी बॅच १५ व १६ च्या विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्र वितरणाचा कार्यक्रम झाला. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून रवीकुमार पंथम, बार्टीचे वरिष्ठ संशोधन अधिकारी दिलावर सय्यद, राह फाउंडेशनचे प्लेसमेंट ऑफिसर अविनाश कांबळे, के.डी. क्लासेसचे कैवल्य देशमुख, एजाज पिरजादे, रमेश वाबळे, नुपूर चव्हाण, पूजा कुरणे आदी उपस्थित होते. ६५ युवक-युवतींना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

पंथम यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, सद्यस्थितीत रोजगाराच्या असंख्य संधी उपलब्ध असल्या तरी आवश्यक कौशल्यांचा अभाव उमेदवारांच्या आड येतो. विद्यार्थी जीवनातच कौशल्य आत्मसात केले तर त्यांचे भविष्य उज्ज्वल होईल. प्रामाणिक प्रयत्न व मेहनत केल्यास यश निश्चित आहे. त्यांनी राह फाउंडेशनच्या उपक्रमाचे कौतुकही केले.

राह फाउंडेशनमार्फत राबविण्यात येणाऱ्या 'समर्थ प्रकल्पा' अंतर्गत ३५ दिवसांचे कौशल्य प्रशिक्षण दिले जाते. यात किरकोळ विक्री व मार्केटिंग कौशल्य, टॅली, जीएसटी, मायक्रोसॉफ्ट ऑफिस सूट, डॉक्युमेंटेशन, फाइलिंग, सॉफ्ट स्किल्स, इंग्रजी बोलणे, जीवन कौशल्ये, आत्मविश्वास वाढविण्याचे प्रशिक्षण अशा विविध विषयांचा समावेश आहे.

१० वी, १२ वी उत्तीर्ण तसेच पदवीधर व उच्च पदवीधर अशा १८ ते २५ वयोगटातील युवक-युवतींना या प्रशिक्षणात सहभागी होता येते. प्रशिक्षण केंद्र साई पॅलेस, दुसरा मजला, आकाशवाणी केंद्रासमोर, प्रोफेसर चौक, सावेडी. संपर्क क्रमांक : ८३०९५८५५३५ / ८६५५६८७५५१.


माजी महापौर भगवान फुलसौंदर व नक्षत्र परिवार (प्राणायाम) तर्फे २०० शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.

# नव्या पिढीच्या शिक्षकांनी हा पेशा जपावा

## प्रा. मकरंद खेर यांचे प्रतिपादन

नगर - शिक्षक होणे ही भाग्याची गोष्ट आहे. शिक्षण क्षेत्रातील नवीन पिढीने शिक्षिका पेशा व्रतस्थ भावनेने प्रामाणिकपणे जपावा असे आवाहन राष्ट्रपती पदक प्राप्त आदर्श शिक्षक प्रा. मकरंद खेर यांनी केले.

शिक्षक दिनी ५ सप्टेंबर रोजी माजी महापौर भगवान फुलसौंदर व नक्षत्र परिवार (प्राणायाम) तर्फे नक्षत्र लॉन्सवर प्रभागातील शिक्षकांच्या कृतज्ञता सोहळ्यात प्रा. खेर बोलत होते.

प्रा. खेर पुढे म्हणाले की, शिक्षकांचे जीवन भाग्यवान असते. कर्तृत्ववान ठरलेले विद्यार्थी आई वडीलानंतर शिक्षकांची आठवण ठेवून भेटण्यासाठी येतात. शिक्षकांना वंदन करून आशीर्वाद घेतात. शिक्षकांपशी मन मोकळे करून भरभरून बोलतात तेव्हा शिक्षिकी पेशाचे सार्थक होते. यासाठी नवीन पिढीच्या शिक्षकांनी हा धंदा नसून प्रोफेशन म्हणजे पेशा असून त्याचे पावित्र्य राखले पाहिजे असे आवाहन त्यांनी केले.

सुमारे २०० शिक्षकांचा यावेळी सत्कार करण्यात आला. अवधूत फुलसौंदर यांनी स्वागत केले. सतीश गुगळे यांनी सूत्रसंचालन केले.

प्रास्ताविकात भगवान फुलसौंदर म्हणाले की, सर्व शिक्षकांना आम्ही नक्षत्र परिवाराचा भाग मानतो. प्रत्येकाला नवीन ज्ञान देणारा आणि नवीन पिढी घडवण्यासाठी योगदान देणारा शिक्षकच असतो. चांगल्या समाजासाठी शिक्षकच प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे योगदान देत असतात.

याप्रसंगी माजी मुख्याध्यापक अभिमन्यू चव्हाण, ध्यानधारणा अभ्यासक मेजर अविनाश ठोकळ, निवृत्त शिक्षक रामकृष्ण आव्हाड, श्रीराम खाडे, बडवे मॅडम, बाबर सर, प्रफुल्ल पवार, दत्तात्रय साबळे, सुनिता दगडे आदींनी मनोगत व्यक्त करून शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास ज्येष्ठ शिक्षकांसह सुनिता फुलसौंदर, विष्णू फुलसौदर, अनुरिता झगडे, अलका मुंदडा, उबाळे बंधू, किशोर गांधी आदी उपस्थित होते.

# शिक्षण जीवन गौरव पुरस्काराने प्रा. युनूस शेख यांचा सन्मान

## अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी उपक्रमशील कार्याची दखल, शिक्षक दिनाच्या कार्यक्रमात माजी शिक्षण संचालकांच्या हस्ते गौरव

नगर - शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देत अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षण प्रवाहात आणण्यासाठी अविरत प्रयत्न करणारे प्रा. युनूस अकबर शेख यांना शिक्षण जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.


प्रा. युनूस अकबर शेख यांना शिक्षण जीवन गौरव पुरस्कार प्रदान करताना दिनकर टेमकर.

हा सन्मान प्रा. शेख यांना समीरभाई फ्रेंड सर्कल व युथ आयकॉन फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात झालेल्या शिक्षक दिनाच्या कार्यक्रमात माजी शिक्षण संचालक दिनकर टेमकर व आय.टी.आय.चे प्राचार्य खालीद जहागीरदार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या वेळी अब्दुल कादीर सर, आरटीओ महेबुब सय्यद, सेक्रेड हार्ट कॉन्व्हेंटच्या माजी प्राचार्या शाहिदा मॅडम, माजी शिक्षण विस्तार अधिकारी अलीम शेख, कार्यक्रम संयोजक समीर शेख, भूमिअभिलेख विभागाचे आरिफ शेख आदी उपस्थित होते.

प्रा. युनूस अकबर शेख हे सध्या जामखेड येथील अँग्लो उर्दू हायस्कूलचे मुख्याध्यापक आहेत. त्यांनी शिक्षणाला केवळ व्यवसाय न मानता एक सामाजिक ध्येय म्हणून स्वीकारले. त्यांच्या पुढाकाराने शैक्षणिक गुणवत्तेसाठी विविध विशेष उपक्रम राबविण्यात आले आहेत. वंचित व अल्पसंख्यांक घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी विशेष भर दिला आहे. तसेच संघटनेच्या माध्यमातून शिक्षक व विद्यार्थ्यांचे विविध प्रश्न शासन दरबारी सोडवले आहे. या शिक्षण क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.



रंग संस्कृती ग्रुपतर्फे विसर्जन मार्गावर ४ ते ५ किलोमीटर लांबीच्या रंगीबेरंगी रांगोळ्या साकारण्यात आल्या.

# गणेश विसर्जनाची मिरवणुकीसमोर रंग संस्कृती ग्रुपच्यावतीने रांगोळ्या

नगर - ग्रामदैवत असलेल्या श्री विशाल गणेशाची विसर्जन मिरवणूक पार पडली. दुपारपासून सुरू झालेली विशाल गणेशाची विसर्जन मिरवणूक संध्याकाळपर्यंत शहरातील प्रमुख मार्गांवरून ढोल-ताशांच्या गजरात आणि भजन-कीर्तनाच्या स्वरात पुढे सरकत राहिली. नगरकरांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत लाडक्या बाप्पाला निरोप दिला. या मिरवणुकीत प्रत्येक मंडळाने आपल्या पद्धतीने सजावट, ढोलपथक, लेझीम, नृत्यपथक यांचे आयोजन करून वातावरण मंगलमय केले.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी रंग संस्कृती ग्रुपतर्फे विसर्जन मार्गावर तब्बल चार ते पाच किलोमीटर लांबीच्या रंगीबेरंगी रांगोळ्या साकारण्यात आल्या. तीन टनांपर्यंत पांढरी व रंगीत रांगोळी, विविध रंग व साहित्य वापरून आकर्षक पायघड्या टाकण्यात आल्या. शहरातील प्रमुख चौक-रस्त्यांवर नगरकरांनी मिरवणूक पाहिली. सामाजिक संघटनांनी ठिकठिकाणी पाणी, प्रसाद व अल्पोपहाराची सोय केली होती. पोलिस प्रशासन, नगरपालिकेचे कर्मचारी व स्वयंसेवकांनी उत्तम व्यवस्थापन करून विसर्जन मिरवणूक शांततेत व उत्साहात पार पडावी यासाठी मेहनत घेतली.

# पंडित दीनदयाल यांची अंत्योदयाची संकल्पना युवा पिढीपर्यंत पोहोचवावी

## विनायक देशमुख यांचे आवाहन, शिक्षण विभागाची विशेष बैठक

नगर - पंडित दीनदयाल उपाध्याय मानव दर्शन हिरक महोत्सवाच्या निमित्ताने त्यांची अंत्योदयाची संकल्पना समाजातील प्रत्येक घटकांपर्यंत प्रामुख्याने युवा पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन पंडित दीनदयाल उपाध्याय मानव दर्शन हीरक महोत्सव समितीचे सदस्य विनायक देशमुख यांनी केले.


पंडित दीनदयाल उपाध्याय मानव दर्शन हीरक महोत्सव समितीच्या कार्यक्रमांचे नियोजन करण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या मार्गदर्शनाने व जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्रीमती संध्या गायकवाड यांच्या पुढाकाराने जिल्ह्यातील गटशिक्षणाधिकाऱ्यांची बैठकीत विनायक देशमुख आदी.

पंडित दीनदयाल उपाध्याय मानव दर्शन हीरक महोत्सव समितीच्या कार्यक्रमांचे नियोजन करण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या मार्गदर्शनाने व जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्रीमती संध्या गायकवाड यांच्या पुढाकाराने जिल्ह्यातील गटशिक्षणाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी श्री. देशमुख बोलत होते. या बैठकीसाठी पंडित दीनदयाल मानव दर्शन हीरक महोत्सव समितीचे ज्येष्ठ सदस्य रवींद्र मुळे, समितीचे सदस्य सचिव तथा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी सुनील शिंदे, शिक्षणाधिकारी (योजना) बाळासाहेब घुगे, उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) आकाश दरेकर व संध्या भोर उपस्थित होते.

यावेळी बोलताना श्री. देशमुख म्हणाले, पंडित दीनदयाल उपाध्याय यांचे अंत्योदयाचे विचार समाजातील सर्वस्तरावर पोहोचविण्यासाठी जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पा. व जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी पुढाकार घेतला आहे. जिल्ह्यातील सर्व महाविद्यालये, माध्यमिक शाळा, शासकीय व खाजगी तंत्रनिकेतने, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अभियांत्रिकी महाविद्यालये औषध निर्माण महाविद्यालये, तांत्रिक शिक्षण संस्थांचे विद्यार्थी हजारोंच्या संख्येने सहभागी होणार आहेत. या कार्यक्रमाच्या समारोप ऑक्टोबर महिन्यात होणार असून यावेळी मुख्यमंत्र्यांसह केंद्रीय व राज्यस्तरीय नेते उपस्थित राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्यासाठी ही एक अभिमानाची बाब असून याच्या यशस्वीतेसाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन श्री. देशमुख यांनी केले.

प्रारंभी शिक्षणाधिकारी श्रीमती संध्या गायकवाड यांनी प्रास्ताविक करताना जिल्ह्यातील सर्व शाळा यात सहभागी होतील याची दक्षता घ्यावी, असे सांगितले.

रवींद्र मुळे यावेळी बोलताना म्हणाले, अंत्योदयाची संकल्पना जर आपण स्वीकारली तर आपल्या समाजाचा आणि देशाचा विकास अधिक वेगाने होईल आणि विश्व गुरू होण्याचे स्वप्न प्रत्यक्षात येऊ शकेल.

सुनील शिंदे यांनी यानिमित्ताने आयोजित करण्यात येणाऱ्या विविध स्पर्धांची माहिती दिली.

यावेळी शिक्षणाधिकारी श्रीमती संध्या गायकवाड यांनी विनायक देशमुख, रवींद्र मुळे व सुनील शिंदे यांचा सत्कार केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभयकुमार वाव्हळ यांनी केले. या बैठकीसाठी जिल्ह्यातील गटशिक्षणाधिकारी व त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी झालेल्या चर्चेत अरविंद कुमावत (अकोले), बाळासाहेब गुंड (संगमनेर), बाबाजी ईरोळे (कोपरगाव), राजेश पावसे (राहाता), मोहनीराज तुंबारे (राहुरी), सुनील दरेकर (श्रीरामपूर ), श्रीमती एम. बी. केदार (नेवासा), प्रदीप चव्हाण (कर्जत), तृप्ती कोलते (नगर) जे. एन. पठाण (मनपा) यांनी सहभाग घेतला.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये सुरु असलेल्या मोफत शिबिरांचा समारोप, १६ शिबिराद्वारे ४ हजार ७५० रुग्णांची विविध आरोग्यावर मोफत तपासणी

नगर - जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आचार्य श्री आनंदऋषीजी महाराज यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या विविध शिबिरांचा ९ सप्टेंबर रोजी समारोप झाला. २ ऑगस्टपासून सुरु झालेल्या १६ शिबिराद्वारे ४ हजार ७५० रुग्णांची विविध आरोग्यावर मोफत तपासणी करण्यात आली. तर यामधील हजारो रुग्णांवर अल्पदरात शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

## कृतार्थ व सेवाभावाने आनंदऋषीजी हॉस्पिटलची रुग्णसेवा : वसंतलाल चोपडा



श्री आनंदऋषीजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त घेण्यात आलेल्या विविध शिबिरांचा समारोप इंडो यूरोलॉजिकल मूत्रपिंडी मूत्राशय स्टोन शस्त्रक्रिया शिबिराने झाला.

या उपक्रमाचा समारोप इंडो यूरोलॉजिकल मूत्रपिंडी मूत्राशय स्टोन शस्त्रक्रिया शिबिराने झाले. शिबिराचे उद्घाटन चंपालाल चोपडा व वसंतलाल चोपडा यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. यावेळी मनसुखलाल पिपाडा, हॉस्पिटलचे कायदेशीर सल्लागार अ‍ॅड. शरद पल्लोड, संतोष बोथरा, डॉ. वसंत कटारिया, सतीश लोढा, सुभाष मुनोत, डॉ. आशिष भंडारी, प्रकाश छल्लाणी, मूत्रविकार शल्यचिकित्सक डॉ. संकेत काळपांडे, डॉ. अमेय सांगळे, डॉ. स्वनीत देशपांडे आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात संतोष बोथरा म्हणाले, वसंतलाल चोपडा वयाच्या ८४ व्या वर्षी देखील सकाळ-संध्याकाळ हॉस्पिटलमध्ये उपस्थित राहून तळमळीने योगदान देत आहे. हॉस्पिटलच्या सेवा कार्यात त्यांचा नेहमीच पुढाकार असतो. तसेच अ‍ॅड. शरद पल्लोड यांचे देखील हॉस्पिटलच्या प्रशासकीय कामात सहकार्य मिळून कायदेशीर मार्गदर्शन मिळत आहे. या आरोग्य सेवेत काम करणारा प्रत्येक व्यक्ती कार्यकर्ता म्हणून काम करत आहे. सर्वांच्या योगदानाने हे रुग्णसेवेच्या मंदिराचे वैभव उभे राहिले आहे. अहिल्यानगर जिल्ह्यासह जवळील चार ते पाच जिल्ह्यातील गरजू नागरिकांना या सेवेचा लाभ मिळत असून, शेवटच्या घटकापर्यंत रुग्णसेवा पोहचविण्याचे कार्य सुरु असल्याची माहिती त्यांनी दिली.

वसंतलाल चोपडा म्हणाले की, व्याधीने त्रासलेल्या पीडितांच्या वेदना दूर करण्याचे काम आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये सुरु आहे. कृतार्थ व सेवाभावाने आरोग्यसेवेचे कार्य सुरू असून, सर्वसामान्यांना अद्यावत व दर्जेदार आरोग्य सुविधा मिळण्यासाठी सातत्याने भर पडत आहे. या सेवा कार्यात हातभार लावण्याचे भाग्य मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

अ‍ॅड. शरद पल्लोड म्हणाले की, आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मानवसेवेच्या महायज्ञात तन, मन, धनाने कार्य सुरू आहे. तारकपूर येथे नेत्रालय उभे राहिले असून, सर्वसामान्यांना चांगली सेवा कशी देता येईल याकडे सातत्याने प्रयत्न सुरु आहे. हॉस्पिटलची ही मानव सेवेची ख्याती देशभर पसरली असल्याचे ते म्हणाले.

डॉ. संकेत काळपांडे यांनी मूत्रपिंड, मूत्राशय संदर्भात सर्व विकार व आजारांवर अद्यावत उपचार सुविधा आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये उपलब्ध असल्याची माहिती दिली.

डॉ.अमेय सांगळे यांनी मूत्रपिंड, मूत्राशयाच्या आजारावर असलेली खर्चिक आरोग्य सुविधा हॉस्पिटल-मध्ये अल्पदरात व एका छताखाली अद्यावत तपासणीसह उपलब्ध आहेत. तर आजारांवरील शस्त्रक्रिया महात्मा फुले जन आरोग्य योजनेतंर्गत मोफत केल्या जात असल्याचे त्यांनी सांगितले. या शिबिरात १११ रुग्णांची मोफत तपासणी तज्ञ डॉक्टरांनी केली. सूत्रसंचालन डॉ.आशिष भंडारी यांनी केले. प्रकाश छल्लाणी यांनी आभार मानले.

# 'वर्धमान महावीर कॉलेज' नगरमध्ये बी.एस्सी. नर्सिंग प्रवेशाचा शुभारंभ



VARDHAMAAN MAHAVIR COLLEGE OF NURSING

नगर - येथील नगर-कल्याण रोडलगत असलेल्या गणेशनगरमधील वर्धमान महावीर कॉलेज ऑफ नर्सिंगमध्ये ४ वर्षांचा अभ्यासक्रम असलेल्या बी.एस्सी. नर्सिंग प्रवेशाचा शुभारंभ करण्यात आला आहे. प्रतीवर्षीप्रमाणे नगर शहर आणि जिल्ह्यासह महाराष्ट्राच्या विविध भागांमधील विद्यार्थीनी प्रवेश घेण्यासाठी गर्दी करू लागल्या आहेत.

वर्धमान महावीर कॉलेज ऑफ नर्सिंगमध्ये एससी, एसटी, भटक्या विमुक्त जमाती, ओबीसी, एसबीसी, स्वाधार योजनेसाठी १०० % शिष्यवृत्ती दिली जाते. येथे अनुभवी व तज्ज्ञ प्राध्यापक असून विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना मेंटॉरशिपवर भर दिला जातो.

अत्याधुनिक कौशल्ये विकसित करण्यासाठी येथे अद्ययावत प्रयोगशाळा सुसज्ज असून क्लिनिकल सिम्युलेशन सेंटरही उपलब्ध आहे.

कॉलेजपासून काही अंतरावरच असलेल्या आनंदऋषिजी हॉस्पिटल व मेडिकल रिसर्च सेंटरमध्ये विद्यार्थिनींना वास्तव अनुभव घेण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जाते.

याशिवाय अत्याधुनिक सुविधाही कॉलेजमध्ये उपलब्ध आहेत. डिजिटल लायब्ररी व आरामदायी वाचनगृहे, विद्यार्थी-केंद्रित कॅम्पस जीवन, उत्कृष्ट वसतिगृह, कँटीन, वाहतूक सेवा ही येथील खास वैशिष्ट्यच.

सर्वांगीण विकास साधताना शैक्षणिक उत्कृष्टता व वैयक्तिक प्रगतीवर लक्ष दिले जाते. कॉलेजचे स्वतः चे हॉस्पीटल असल्याने शिक्षणासोबत अनुभव मिळतो. १००% प्लेसमेंट. विद्यार्थिनींच्या करिअरच्या उद्दिष्टांना येथे आधार मिळतो. नर्सिंग ही फक्त व्यावसायिक नोकरी नाही तर मानवतेची सेवा आहे. उज्ज्वल करिअरचा प्रवास करण्यासाठी विद्यार्थिनी येथे प्रवेश घेण्यास प्रथम पसंती दर्शवतात, असे दिसून येते.

प्रवेशासाठी कॅम्पस पत्ता: १५२/२, गणेशनगर, नगर-कल्याण रोड, रेल्वे फ्लायओव्हर ब्रिजजवळ, नालेगाव, अहिल्यानगर - ४१४ ००१ वेबसाईट : www.vmcn.edu.in ई-मेल : vmcn.admgmail.com कॉलेज कोड -१५३१५७ असून सीईटी कोड -०९४६५ आहे. अधिक माहितीसाठी ७३८५५०२४८४/९५२७३३५३१७ किंवा ७४९९८६०९३५ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा, असे आवाहन आहे.



ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने सौ. उज्वला सुर्यवंशी यांना राज्यस्तरीय पुरस्कार सन्मानित करण्यात आले.

# 'ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्थे'च्यावतीने उज्वला सुर्यवंशी यांना राज्यस्तरीय पुरस्कार

नगर - ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने अनाथ/ निराधार मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप व राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान सोहळा पार पडला. यात संस्थेच्यावतीने श्रीकांत पेमराज गुगळे हायस्कुलच्या शिक्षिका सौ. उज्वला प्रमोद सुर्यवंशी यांना शैक्षणिक क्षेत्रातील २७ वर्षांच्या प्रदीर्घ एसएससी बोर्ड परीक्षेत १५ वर्षे १००% निकाल लावण्यामध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिल्याबद्दल आदर्श शिक्षिका राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्यात आले.

या प्रसंगी नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे, राजेंद्र फाळके, डॉ. वंदनाताई मुरकुटे, प्राचार्य कुंडलीकराव शिंदे आदी उपस्थित होते.

# 'हिंदसेवा'च्या सेवकांच्या सहकारी पतपेढीच्या ऑनलाईन अ‍ॅपचा शुभारंभ

## हिंदसेवा मंडळाच्या पतपेढीचा जिल्ह्यात नावलौकिक : आमदार संग्राम जगताप

नगर - हिंदसेवा मंडळाचा जिल्ह्यात नावलौकिक आहे. हिंद सेवा मंडळातील सेवकांची सहकारी पतपेढी ही जिल्ह्यात कार्यरत आहे. बदलत्या युगाप्रमाणे ऑनलाइन अ‍ॅप द्वारे सभासदांना आर्थिक व्यवहाराची माहिती मिळणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळात संस्थेने ऑनलाइन अ‍ॅप सुरू करण्याचा निर्णय संस्थेनी घेतला ही कौतुकास्पद बाब आहे. सभासदांच्या अडचणीच्या काळात पाठीशी उभी राहणारी ही संस्था आहे. चांगल्या विचारांचे संचालक मंडळ असल्याने संस्थेची भरभराट होत आहे. हिंदसेवा मंडळाच्या पतपेढीचा जिल्ह्यात नावलौकिक आहे, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले आहे.



हिंद सेवा मंडळाच्या सेवकांची सहकारी पतपेढी लि. या संस्थेच्या ऑनलाईन मोबाईल अ‍ॅपचे उद्घाटन करताना आ.संग्राम जगताप.

हिंद सेवा मंडळाच्या सेवकांची सहकारी पतपेढी लि. या संस्थेच्या ऑनलाईन मोबाईल अ‍ॅपचे उद्घाटन आ.संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हिंद सेवा मंडळाचे माजी कार्याध्यक्ष अ‍ॅड.अनंतराव फडणीस, कार्याध्यक्ष डॉ.रमेशचंद्र झरकर, ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, संचालक सुमतीलाल कोठारी, जगदीश झालानी, अनंत देसाई, सौ. ज्योतीताई कुलकर्णी, सहाय्यक सचिव बि.यु. कुलकर्णी, सेवानिवृत्त मुख्याध्यापक संजय मुदगल, हिंदसेवा मंडळाच्या सेवकांच्या सहकारी पतपेढीचे अध्यक्ष दीपक आरडे, उपाध्यक्ष सौ.स्मिता पुजारी, खजिनदार सतिश फरताडे, कार्याध्यक्ष, कर्ज उपसमितीचे अमोल कदम, मधुकर पवार, सेक्रेटरी किशोर कुलकर्णी, अधिक जोशी, राहुल गागरे, मिलींद देशपांडे, बाळासाहेब भोत, सतिश म्हसे, महेश डावरे, सौ.वैशाली दारवेकर, नितीन केणे, दीपक शिरसाठ आदींसह सेवक वर्ग ज्ञानेश भागवत, निलेश जोशी, सौरभ ठाणगे, राहुल साठे आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात दीपक आरडे म्हणाले, बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात मागे राहिला नको म्हणून पतसंस्थेच्या वतीने ऑनलाईन अ‍ॅपचा शुभारंभ करण्यात आला आहे. या माध्यमातून प्रत्येक सभासदाला आर्थिक व्यवहाराची माहिती सहजपणे उपलब्ध होणार आहे. पतसंस्थेचा अ वर्ग ऑडिट व १००% वसुली असल्याने संस्था प्रगतीपथावर आहे. पतसंस्थेच्या भरभराटीसाठी सर्व संचालक मंडळ अविरतपणे कार्य करीत आहे. तसेच हिंद सेवा मंडळाचे सर्व पदाधिकारी व संचालक मंडळाचे सहकार्य मिळत असते. अ वर्ग व ब व वर्ग सभासदांनी टाकलेल्या विश्वासावरच संस्थेची प्रगती होत आहे.

अ‍ॅड.अनंत फडणीस म्हणाले, सर्व सभासदांनी सावधान व सतर्कतेने मोबाईल अ‍ॅपचा वापर करावा. ओटीपी व पासवर्ड कोणालाही देऊ नये. ऑनलाइन फसवणुकीचे प्रकार सध्या खूप वाढत आहे. हिंद सेवा मंडळाच्या सेवकांच्या सहकारी पतपेढीने ऑनलाइन अ‍ॅपच्या माध्यमातून सभासदांना आर्थिक व्यवहाराची माहिती उपलब्ध केली आहे. ही अभिनंदनास्पद बाब आहे.

रमेशचंद्र झरकर म्हणाले, शंभर टक्के वसुली होत असल्याने हिंद सेवा मंडळाची पतपेढी ही कायमच प्रगतीपथावर असलेली पतसंस्था आहे. पतसंस्थेला भविष्यात आणखी चांगले दिवस येवो. सूत्रसंचालन नितीन केणे यांनी केले. दीपक शिरसाठ यांनी आभार मानले.

# बोल फाउंडेशनतर्फे शिक्षकांचा कृतज्ञता सोहळा

नगर - ब्रेड ऑफ लाईफ (बोल) फाउंडेशन द्वारे भिंगार येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर व नूतन माध्यमिक शाळा या ठिकाणी ३६ निवृत्त आणि कार्यरत असलेल्या गुरुजनांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह व गुलाब पुष्प देऊन गौरविण्यात आहे.



ब्रेड ऑफ लाईफ (बोल) फाउंडेशनद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर व नूतन माध्यमिक शाळा या ठिकाणी ३६ निवृत्त आणि कार्यरत असलेल्या गुरुजनांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह व गुलाबपुष्प देऊन गौरविण्यात आहे.

शिक्षक गौरव दिनाच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष अशोक गुर्जर, चार्टर्ड अकाउंटंट सौ. माधुरी गुर्जर आणि नागरदेवळे ग्रामपंचायत सदस्य सौ. सोनाली नंदकिशोर भंडारे यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची प्रस्तावना व सुत्रसंचालन फाउंडेशनच्या सचिव सौ. शोभा पाटोळे यांनी केली. कार्यक्रमाची सुरुवात अशोक गुर्जर, सौ. माधुरी गुर्जर, सौ. सोनाली नंदकिशोर भंडारे, विनय महाजन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळेचे मुख्याध्यापक संजय शिंदे, माजी मुख्याध्यापक कारभारी मदन आव्हाड व फाउंडेशनचे अध्यक्ष जोसेफ पाटोळे यांच्या हस्ते दिप प्रज्वलनाने झाली. आणि भारताचे दुसरे राष्ट्रपती सर्वपल्ली डॉ. राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून करण्यात आली,

यावेळी प्रमुख अतिथी अशोक गुर्जर सरांचा सत्कार जोसेफ पाटोळे यांच्यातर्फे करण्यात आला व प्रमुख पाहुण्या सौ. माधुरी गुर्जर आणि सौ. सौनाली भंडारे यांचा सत्कार शोभा पाटोळे यांच्या हस्ते करण्यात आला.

याप्रसंगी अक्षरा तोरडी व श्रावणी शेलार या विद्यार्थीनीनी शिक्षकांप्रती विद्यार्थीदशेला सकारात्मक विकासाकडे यशाची वाटचाल व जीवन घडवण्याचे कार्य गुरुवर्य करीत असतात म्हणून कृतज्ञता व्यक्त केली.

शिक्षीका मनिषा साठे, स्नेहल लवंडे, गुलमहंमद शेख आणि मुख्याध्यापक संजय शिंदे यांनी गुरुजनांप्रती महत्त्व व्यक्त केले.

भिंगार जेष्ठ नागरिक संघ प्रमुख सुभाष होडगे यांनीही विचार मांडले.

समाजाची-सकारात्मक जडणघडण करण्यासाठी शिक्षकांचे अनन्यसाधारण महत्व आहे, अशोक गुर्जर यांनी कार्यक्रमाची सांगता अनिकेत नितीन पाटोळे यांनी आभार व्यक्त केल्यानंतर झाली. शेवटी अंतोन पाटोळे यांनी विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप केले.



ईद-ए-मिलादनिमित्त मतिमंद विद्यार्थ्यांना खाऊ व जीवनावश्यक वस्तू व किराणाचे वाटप करण्यात आले.

# ईद-ए-मिलादनिमित्त मतिमंद विद्यार्थ्यांना खाऊ व जीवनावश्यक वस्तू व किराणा वाटप

नगर - हजरत मोहम्मद पैगंबर यांच्या जयंतीनिमित्त (ईद-ए-मिलाद) माजी नगरसेवक शेख मुदस्सर अहमद इसहाक व त्यांच्या मित्र परिवाराच्यावतीने तपोवन येथील मतिमंद मुलांच्या शाळेत विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. तसेच शाळेला दैनंदिन जीवनावश्यक वस्तू व किराणा साहित्य देण्यात आले.

यावेळी शेख मुदस्सर म्हणाले, ईद-ए-मिलाद हा सण फक्त उत्सवाचा नाही, तर सेवा भावनेचा आणि मानवतेचा उत्सव आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीला मदत करण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे.

यावेळी जमीर सेतूवाले, अरबाज शेख, सय्यद शफी बाबा, जवाद भाई, अरशीद शेख, मोईन शेख, आतिफ, परवेज शेख, युथ आयकॉन फाउंडेशनचे सबील सय्यद आदी उपस्थित होते.

# रोटरी क्लब ऑफ अ.नगर आयोजित शांतता सप्ताहाचे उत्कृष्ट नियोजन

## सामाजिक शांती प्रस्थापित करण्यासाठी घेतला पुढाकार

नगर - रोटरी क्लब ऑफ अ.नगर आयोजित रोटरी शांतता सप्ताहाचे उत्कृष्ट नियोजन करण्यात आले आहे. रोटरी प्रांत ३१३२ च्या शांतता कमिटीच्या संचालक डॉ. सुधा कांकरिया यांच्या नेतृत्वाखाली ७ दिवसात ७ वेगवेगळया शांती प्रोजेक्टचे आयोजन करून सामाजिक शांती प्रस्थापित करण्यासाठी क्लबने पुढाकार घेतला आहे. १५ ते २१ सप्टेंबर या दरम्यान सदर सप्ताह साजरा करण्यात येत असुन त्यात शालेय वयोगट, महाविद्यालयातील तरूण वर्ग तसेच इतर अनेक सामाजिक संस्था यांचा सहभाग घेऊन कृतीशील शांतीचा संदेश सर्वदूर पोहचविण्यात येत आहे, अशी माहिती अध्यक्ष सुभाष गर्जे यांनी दिली.

डॉ. सुधा कांकरिया म्हणाल्या कि १५ सप्टेंबर रोजी साईबन येथे रोटरी पीस सेंटरचे उद्घाटन होत आहे. त्या अंतर्गत रोटरी पीस पार्क, पीस सेल्फी पॉईंट, पीस टेकडी, मेडिटेशन झोपडी, राजयोगा मेडिटेशन पोस्टर प्रदर्शन, निरोगी हृदयआरोग्यातुन शांतीकडे हे वैज्ञानिक प्रदर्शनी यांचा समावेश आहे. यासाठी डॉ. प्रकाश कांकरिया सहकार्य करीत आहेत. १६ सप्टेंबर रोजी डॉ. दादासाहेब करंजुले यांच्या सहकार्यातून शासकिय तंत्रनिकेतन येथे सामाजिक शांततेसाठी तरूण पिढीचा सहभाग यावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात येत आहे. निलेश वैकर यांच्या सहकार्याने ग.ज.चितंबर विद्यालयात 'शांततेची सुरूवात माझ्यापासून' या विषयावर चित्रकला स्पर्धेचे आयोजन केले आहे. तसेच भुषण देशमुख यांच्या सहकार्याने स्नेहालयचा रेडिओ नगर ९०.४ एफ एम वर विविध तज्ञांच्या मुलाखती प्रसारित केल्या जाणार आहेत. विविध शाळेच्या सहभागातून २० सप्टेंबर रोजी 'शांतता रॅली'चे आयोजन केले असुन त्याची सांगता शांततेच्या प्रतिज्ञेने होणार आहे. तर २१ सप्टेंबर या जागतिक शांतता दिवसाच्या निमित्ताने विश्वशांतीसाठी ऑनलाईन संघटीत मेडिटेशन होणार असून त्यात देश विदेशातील नागरिक सहभागी होणार आहेत.

प्रसंगी संघटनांनी सहभागी व्हावे असे आवाहन रोटरी शांतता समितीने केले आहे. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सचिव संदीप ठोंबे, पुरूषोत्तम जाधव, नितिन थाडे, दिपक गुजराथी, माधवराव देशमुख, श्री हर्षवर्धन व सौ. प्रिती सोनवणे, अनघा राऊत, रविंद्र राऊत परिश्रम घेत आहेत.

# भाजपाच्या मध्य मंडलाची कार्यकारणी जाहीर

नगर - भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, विधानसभेचे सभापती प्रा.राम शिंदे यांच्या सूचनेप्रमाणे तसेच अभय आगरकर, शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, वसंत लोढा, महेंद्र गंधे, सुनील रामदासी, सचिन पारखी यांच्या मार्गदर्शनानुसार अहिल्यानगर येथील येणाऱ्या महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महानगर शहर मध्य मंडलाची कार्यकारणी नुकतीच जाहीर करण्यात आली आहे. यात जुन्या व नवीन कार्यकर्त्यांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच समाजातील सर्व घटकांचा प्रामुख्याने समावेश करण्यात आला आहे, अशी माहिती मध्य मंडल अध्यक्ष मयूर बोचुघोळ यांनी दिली आहे.

अहिल्यानगर महानगर शहराच्या मध्यमंडलाची कार्यकारणी पुढील प्रमाणे अध्यक्षपदी मयूर बोचुघोळ, उपाध्यक्षपदी वैभव लांडगे, प्रकाश जोशी, डॉ.दर्शन करमाळकर, विक्रम शिंदे, उज्वला भांगे, विनोद बोगा, सरचिटणीसपदी नीरज राठोड, राजेंद्र वाडेकर, अमोल निस्ताने यांची निवड तर चिटणीसपदी नितीन जोशी, लक्ष्मीकांत तिवारी, सोनाली पाठक, सुनंदा गंजी, देवेंद्र बेरड, हर्षल बोरा यांची चिटणीसपदी निवड करण्यात आली.

पियुष तावरे युवा मोर्चा अध्यक्ष, अनिल निकम ओबीसी मोर्चा अध्यक्ष, सुरेखा जंगम महिला मोर्चा अध्यक्ष, सुनील सकट अनुसूचित जाती मोर्चा अध्यक्ष, वसंत रोहोकले किसान मोर्चा अध्यक्ष, विलास बुगे अनुसूचित जमाती मोर्चा अध्यक्ष, अक्रम पठाण अल्पसंख्यांक मोर्चा अध्यक्ष, प्रशांत बुगडे व्यापारी आघाडी अध्यक्ष यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे.

कार्यकारणी सदस्यपदी- कपिल सुडके, अक्षय ढवळे, सचिन पळशीकर, अतुल जोशी, दीपक दंडनाईक, गणेश कानगावकर, निकेश बाविस्कर, राज शेलार, अक्षय दिवटे, भाऊसाहेब दळवी, अनुप पाटोळे, रोहन सांगोळे, अमोल थोरात, धीरज पडोळे, सतीश रासने, विजय मडके, विलास भोपळे, सचिन वाघ, प्रवीण भंडारी, विजय मैड, आशिष ताकपिरे, प्रविण बोगावत, वैभव ताकपिरे, महेश हेडा, संदीप भोसले, राहुल गुंडू, भैया भांडेकर, मिराताई सरोदे, सावित्री भोसले, सीमा जगधने, सुनिता उल्हारे, अंजली आहेर, अवंती थडकिया, कावेरी घोरपडे, उषा आहेर, पोपट भोसले, अशोक भोसले, रोहित तोलानी, विवेक मुळे, रत्नाकर घोरपडे, अविनाश परळकर, विशाल बेरड, प्रेम पाटोळे, स्वप्निल बेद्रे आदींची नियुक्ती करण्यात आली आहे.



महाराष्ट्र सेट २०२५ परिक्षेत उत्तीर्ण झाल्याबद्दल कु. वैष्णवी बाळासाहेब आगे हिचा मर्चंट असो.चे माजी अध्यक्ष व ज्येष्ठ पत्रकार रमण मुथ्था यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी ज्येष्ठ पत्रकार रमेश कोठारी, पद्माकर शिंप्पी, मनोजकुमार आगे, बाळासाहेब आगे, नागेश सावंत तसेच दिलीप नागरे, सुरेश डोखे, सुनिल बोलके, सुभाष जंगले, निलेश भालेराव, चंद्रकांत बिडवे, ज्ञानेश्वर वाघस्कर, सुनिल साबळे, माळवे काका आदी.



## प्रवरा मेडिकल ट्रस्ट कॉलेज ऑफ फार्मसी, शेवगाव येथे शिक्षक दिन उत्साहात साजरा

प्रवरा मेडिकल ट्रस्ट कॉलेज ऑफ फार्मसी, शेवगाव येथे शिक्षक दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी दिवसभरामध्ये आलेल्या अनुभवाचे कथन नवीन विद्यार्थी शिक्षकांनी केले. प्राचार्य महेश भालसिंग यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या कार्याविषयी माहिती दिली. यावेळी कार्यक्रमास प्रभारी प्राचार्य अश्विनी तेलोरे, प्राचार्य महेश भालसिंग, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# लज्जत कॉर्न मेथी पुलावची

झटपट रेसिपी



मित्रांनो, रात्रीच्या जेवणासाठी झटपट काहीतरी बनवायचं असेल आणि फार कष्टही घ्यायचे नसतील तर कॉर्न मेथी पुलाव हा बेस्ट ऑप्शन आहे. नेहमीच्या व्हेज पुलावला पर्याय म्हणून हा पुलाव करता येईल.

**सामग्री:** दीड कप बासमती तांदूळ, थोडी मेथीची पानं, अर्धा चमचा जीरं, दोन वेलच्या, तीन लवंग, दालचिनीचे दोन तुकडे, एक तमालपत्र, चार हिरव्या मिरच्या, दोन कांदे, दोन चमचे आलं-लसूण पेस्ट, १०० ग्रॅम उकडलेले स्वीटकॉर्न, एक चमचा लबाचा रस, चार चमचे तूप, मीठ

**कृती:** सर्वात आधी तांदूळ धुवून साधारण पंधरा मिनिटं बाजूला ठेवा. मेथीची पानं धुवून घ्या. आता कढईत तूप घाला. वितळल्यावर जीरं, लवंग, दालचिनी, तमालपत्र घाला. परतून घ्या. त्यात चिरलेला कांदा आणि दोन मिरच्या घालून परता. कांद्याचा रंग सोनेरी झाल्यावर त्यात आलं-लसूण पेस्ट घाला. यानंतर मेथीची पानं आणि मक्याचे दाणे घालून परता. आता तांदूळ घालून परता. यानंतर त्यात प्रमाणात पाणी घाला, चवीनुसार मीठ घालून तांदूळ शिजू द्या. कढईवर ताटली ठेवा. पाच ते दहा मिनिटांनी पुलाव झालेला असेल.




# डिलिव्हरी बॉय झाला उपजिल्हाधिकारी

अचिव्हर



स्पर्धा परीक्षेतील यशासाठी प्रचंड मेहनत आणि इच्छा शक्तीची आवश्यकता असते. झारखंडमधील गिरिडीह येथील सूरज यादवने प्रचंड मेहनत आणि जबरदस्त इच्छाशक्तीच्या जोरावर यश मिळवत तरुणांसमोर नवा आदर्श ठेवला आहे. सूरज झारखंड लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण झाला आहे. आता तो उपजिल्हाधिकारी बनला आहे. विशेष म्हणजे सूरज हा स्विगीमध्ये डिलिव्हरी बॉय म्हणून काम करत अभ्यास करायचा. त्याने रॅपिडो बाईकदेखील चालवलेली आहे. झारखंड लोकसेवा आयोगाने काही दिवसांपूर्वी संयुक्त नागरी सेवा मुख्य परीक्षा २०२३ चा निकाल जाहीर केला. मुख्य परीक्षा २२ ते २४ जून २०२४ दरम्यान झाली होती. त्यानंतर पात्र उमेदवारांनी मुलाखत दिली होती. तब्बल दहा महिन्यांच्या विलंबानंतर आता निकाल जाहीर झाला आहे. यात सूरजने घवघवीत यश मिळवले आहे.

सूरज एका साध्या कुटुंबामध्ये जन्मला. त्याचे वडील गवंडी काम करतात. त्याच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती फारशी चांगली नाही. अडचणी असूनही सूरजने अधिकारी होण्याचे स्वप्न पाहिले होते. तो रांचीमध्ये राहून परीक्षेची तयारी करत होता. त्याला घरून पैसेही मिळत नव्हते, त्यामुळे त्याने अभ्यासाचा खर्च भागवण्यासाठी डिलिव्हरी बॉय म्हणून काम केले.

**मित्रांनी केली मदत** सूरजकडे पुस्तकांसाठी पैसे नव्हते. त्यामुळे तो स्विगी आणि रॅपिडोमध्ये 'डिलिव्हरी बॉय' म्हणून काम करायचा. सुरुवातीला त्याच्याकडे बाईक नव्हती. त्या वेळी त्याचे मित्र राजेश नायक आणि संदीप मंडल यांनी त्याला आर्थिक मदत केली. या दोघांनी शिष्यवृत्तीच्या पैशातून सूरजला एक जुनी बाईक खरेदी करून दिली होती. या बाईकच्या मदतीने सूरज रोज पाच तास डिलिव्हरीचे काम करायचा आणि त्यानंतर अभ्यास करायचा.

**पत्नीने दिली साथ**

सूरजच्या यशात त्याच्या कुटुंबाचा मोठा वाटा आहे. त्याच्या पालकांनी त्याला नेहमी प्रेरित केले. बहिणीने सूरजच्या अभ्यासात अडथळा येऊ नये म्हणून सर्व कामे केली. सूरजच्या पत्नीनेही त्याला साथ दिली. कुटुंबाचा सामूहिक संघर्ष आणि सहकार्यामुळे सूरज या परीक्षेत यश मिळवू शकला आहे. सूरजने 'जेपीएससी' परीक्षेत ११० वा क्रमांक मिळवला. तो गेल्या काही वर्षांपासून परीक्षेची तयारी करत होता. हा त्याचा दुसरा प्रयत्न होता, यात घवघवीत यश मिळवल्यामुळे सर्वच स्तरातून त्याचे कौतुक होत आहे.

## शेर की जुबानी

ना जाने इतनी मोहब्बत
कहां से आई है उसके लिए।
की मेरा दिल भी
उसकी खातिर
मुझसे रूठ जाता है।

है कुबुल शिकायते
हमें आपकी सारी,
लेकिन कहना
तो थोडा
मुस्कुराकर कहना

बहुत खुबसूरत होते
हैं ऐसे रिश्ते
जिन पर कोई
हक भी ना हो
और शक भी ना हो।

## ॲप वर्ल्ड

### व्हॉट्स ॲपवर आता कागदपत्रे मिळण्याची सोय




ड्रायव्हिंग लायसन्स मिळवणे असो कवा लग्नाचे प्रमाणपत्र; आता कुठेही जाण्याची गरज नाही. ही सर्व कामे व्हॉट्स अपद्वारे घरबसल्या करता येतात. दिल्ली सरकार यासाठी एका योजनेवर काम करत आहे. त्याअंतर्गत लोक घरबसल्या विवाह प्रमाणपत्र आणि सरकारी सेवांशी संबंधित सर्व कागदपत्रांसाठी अर्ज करू शकतील. या उपक्रमाचे नाव 'व्हॉट्स ॲप गव्हर्नन्स' असे ठेवण्यात आले आहे.

ही सेवा सुरू झाल्यानंतर, लोकांना सरकारी कामासाठी कोणताही त्रास सहन करावा लागणार नाही कवा लांब रांगेत थांबावे लागणार नाही. ही कागदपत्रे व्हॉट्स अपवर बनवली जातील. विवाह प्रमाणपत्र, जातीचा दाखला, जन्म प्रमाणपत्र आणि ड्रायव्हिंग लायसन्ससह अनेक सरकारी कामे 'व्हॉट्स अप गव्हर्नन्स'अंतर्गत आणली जातील. लोक या कागदपत्रांसाठी अर्ज करू शकतील, त्यांची कागदपत्रे व्हॉट्स अपद्वारे पडताळू शकतील आणि डाउनलोड करू शकतील. ही संपूर्ण प्रक्रिया जलद होईल आणि लोकांना सरकारी विभागांमध्ये धावपळ करावी लागणार नाही. यासोबतच भ्रष्टाचारालाही आळा बसण्याची अपेक्षा आहे.

**ही सेवा कशी काम करेल?**

'व्हॉट्स अप गव्हर्नन्स' प्लॅटफॉर्मवर 'एआय'संचालित चॅटबॉट असेल. ते हदी आणि इंग्रजी भाषांमध्ये काम करेल. वापरकर्त्यांना मदत करण्यासोबतच, ते संपूर्ण सेवा स्वयंचलित करेल आणि वापरकर्त्यांना सर्व विभागांशी संबंधित माहिती प्रदान करेल. सुरुवातीला या प्लॅटफॉर्मवर २५-३० सेवा एकत्रित केल्या जातील. नंतर इतर विभागदेखील त्यात सामील होतील.

## टिप्स अँड ट्रिक्स



### व्हॉट्स ॲपवर 'एआय' लिहील मेसेज

व्हॉट्स अपने आपल्या लाखो वापरकर्त्यांसाठी एक जबरदस्त फीचर लॉंच केले आहे. त्यामुळे मेसेज लिहिणे आता आणखी सोपे आणि मजेदार होणार आहे. 'मेटा एआय रायटग हेल्प' या नव्या फीचरच्या मदतीने तुम्ही आपले मेसेज व्यावसायिक, मजेशीर कवा भावनिक शैलीत सहज लिहू शकता.

**हे फीचर काम कसं करतं?**


मेसेज टाइप करताना चॅट बॉक्समध्ये दिसणाऱ्या पेन्सिल आयकॉनवर टॅप करा. 'मेटा एआय' तुम्हाला ३-४ पर्याय सुचवेल. जे प्रोफेशनल, फनी, सपोर्टिव्ह कवा प्रूफरीड अशा विविध शैलींमध्ये असतील. तुम्हाला हवा तो पर्याय निवडा आणि पाठवा. विशेष म्हणजे व्हॉट्स अपने गोपनीयतेची पूर्ण काळजी घेतली आहे. तुमचे मेसेज संग्रहित कवा वाचले जाणार नाहीत. फक्त सूचना मिळतील.

**या फीचरचा फायदा कोणाला होईल?**

विद्यार्थ्यांना प्राध्यापकांना असाइनमेंट्स पाठवताना, व्यावसायिकांना बॉस कवा क्लायंटशी संवाद साधताना आणि मित्र-कुटुंबासोबत गप्पा मारताना हे फीचर उपयुक्त ठरेल.

# सीए व्हायचं, की सीएफए?

करीअरवेध




जागतिकीकरण आणि आर्थिक स्पर्धेच्या युगात वित्तीय क्षेत्रात करिअर करण्याची संधी तरुणांना आकर्षित करते. लेखापरीक्षण, करसल्ला, वित्तीय विश्लेषण आणि गुंतवणूक व्यवस्थापन या क्षेत्रांमध्ये दोन महत्त्वाच्या व्यावसायिक पदवी चर्चेत असतात. त्या म्हणजे चार्टर्ड अकाउंटंट (सीए) आणि चार्टर्ड फायनान्शिअल ॲनालिस्ट (सीएफए). दोन्ही पदव्यांमुळे करिअरच्या उत्तम संधी मिळतात, मात्र अभ्यासक्रम, स्वरूप आणि कार्यक्षेत्र यात दोघांमध्ये फरक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी यापैकी एक निवडताना आपल्या आवडी, कौशल्ये आणि ध्येय लक्षात घेऊन निर्णय घेणे महत्त्वाचे ठरते.

**चार्टर्ड अकाउंटंट बनण्यासाठी...**

चार्टर्ड अकाउंटंट ही भारतातील प्रतिष्ठित व्यावसायिक पदव्यांपैकी एक आहे. लेखापरीक्षण, करसल्ला, कंपनी कायदे, लेखा पद्धती आणि वित्तीय व्यवस्थापन या विषयांवर आधारित हा अभ्यासक्रम अनेक टप्प्यांतून पूर्ण करावा लागतो.

फाउंडेशन, इंटरमिजिएट आणि फायनल या टप्प्यांबरोबरच प्रशिक्षण म्हणून ठरावीक कालावधीची आर्टिकलशिप आवश्यक असते. त्यामुळे अभ्यासक्रमाचा कालावधी तुलनेने अधिक असतो; परंतु हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर विद्यार्थी लेखापरीक्षण, करसल्ला, कंपनी वित्तीय व्यवस्थापन, बँकग आणि सल्लागार क्षेत्रात उत्तम संधी मिळवू शकतो.

**'चार्टर्ड फायनान्शिअल ॲनालिस्ट' म्हणजे काय?**

'चार्टर्ड फायनान्शिअल ॲनालिस्ट' ही अमेरिकेतील जागतिक स्तरावर मान्यता असलेली पदवी आहे. ती 'सीएफए इन्स्टिट्यूट'कडून दिली जाते. अभ्यासक्रमाचा मुख्य भर गुंतवणूक व्यवस्थापन, भांडवली बाजार, पोर्टफोलिओ विश्लेषण आणि वित्तीय धोरणांवर असतो. या पदवीसाठी तीन स्तरांच्या परीक्षा द्याव्या लागतात. पहिल्या स्तरामध्ये गुंतवणुकीसाठी आवश्यक साधने, नीतिशास्त्र आणि गणितीय पद्धतींचा अभ्यास होतो.

दुसऱ्या स्तरामध्ये मालमत्ता मूल्यांकन व वित्तीय साधनांचे विश्लेषण शिकवले जाते. तिसऱ्या स्तरामध्ये पोर्टफोलिओ व्यवस्थापन आणि संपत्ती नियोजनावर भर असतो.

हा अभ्यासक्रम कठीण आणि वेळखाऊ आहे. त्यासाठी भरपूर तयारीची गरज असते. सीएफए चार्टर मिळवला की जागतिक वित्तीय उद्योगात उमेदवाराला उच्च मान्यता प्राप्त होते. या पदवीधारकांना गुंतवणूक बँकग, इक्विटी रिसर्च, मालमत्ता व्यवस्थापन कंपन्या, हेज फंड्स आणि आंतरराष्ट्रीय सल्लागार क्षेत्रात संधी मिळतात.

**सीए आणि सीएफए यातील फरक**

सीए प्रामुख्याने लेखापरीक्षण, करसल्ला आणि लेखा प्रणालींमध्ये तज्ज्ञ असतो, तर सीएफए वित्तीय बाजार, गुंतवणूक आणि पोर्टफोलिओ व्यवस्थापनात विशेषज्ञ असतो. सीएला भारतात उत्तम मागणी असते, तर सीएफएला आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक संधी असतात. सीएसाठी तपशीलवार काम करण्याची क्षमता, कायदेशीर बाबींचे ज्ञान आणि लेखा पद्धतींमध्ये बारकाईने लक्ष देण्याची कौशल्ये महत्त्वाची असतात. तर सीएफएसाठी विलेषणात्मक विचारसरणी, जागतिक बाजारातील चढउतारांचे आकलन आणि आर्थिक नियोजनाचे कौशल्य आवश्यक असते.

# एथनिक्सचे बदलते ट्रेंड्स

फॅशन पॅशन




दोस्तांनो, पुढचा काळ सणांचा, उत्सवांचा आणि अर्थातच उत्साहाचा. नवरात्र, दसरा, दिवाळी आणि त्यानंतर सुरू होणारी लग्नसराई म्हणजे फॅशनप्रेमींसाठी सुवर्णसंधी. या दिवसात नेहमीच्या जीन्स, टी शर्ट, शर्ट, ट्राउझर अशा कपड्यांऐवजी पारंपरिक पेहराव करता येतात. मुलांच्या एथनिक्समध्येही प्रचंड व्हरायटी बघायला मिळते. सणासुदीच्या निमित्ताने खरेदीचा विचार करत असाल तर या टिप्स तुम्हाला उपयोगी पडतील.

* मुलं फॅशनच्या बाबतीत फारसे प्रयोग करताना दिसत नाहीत. नेहमीचे रंग, टिपिकल प्रट्स यांनाच मुलं प्राधान्य देतात. पण आता जुना काळ राहिलेला नाही. त्यामुळे हटके प्रट्स आणि गडद रंगांना तुम्ही प्राधान्य देऊ शकता. गडद रंगाचा कुर्ता आणि पांढरा पायजमा कवा पारंपरिक बॉटमचा कोणताही प्रकार तुम्ही ट्राय करू शकता.
* नेहमीच्या वापरातले बूट बाजूला ठेवा. त्याऐवजी जुती, कोल्हापुरीसारख्या एथनिक पादत्राणांची निवड करा. मुलांच्या पारंपरिक पादत्राणांची मोठी व्हरायटी पहायला मिळते. त्यामुळे न घाबरता नवे प्रयोग करा.
* कुर्ता-पायजमा हा एव्हरग्रीन पेहराव असला तरी एथनिक्सच्या खरेदीसाठी बाजारात थोडं हडा. नेहरू जॅकेट, बंदगळा, जोधपुरी जॅकेट, पलाझो पँट्स अशा कपड्यांचा सध्या बराच ट्रेंड आहे. यापैकी काहीतरी नक्की ट्राय करा. स्कार्फ कवा स्टोल कॅरी करून पारंपरिक लूकला हटके ट्विस्टही देता येईल.

# तो लग्नाला घाबरतोय...

मॅच मेकीग



मी २७ वर्षांची तरुणी असून पाच वर्षांपासून एका मुलासोबत रिलेशनशीपमध्ये आहे. आमचं एकमेकांवर खूप प्रेम आहे. पण लग्नाचा विषय तो शिताफीने टाळतो. त्याने त्याच्या आईवडिलांना आमच्याबद्दल काहीच सांगितलेलं नाही. तिकडे माझ्या आईवडिलांनी माझ्यामागे लग्नाचा तगादा लावला आहे. त्यांनी माझ्यासाठी स्थळं शोधायला सुरूवात केली आहे. माझा पियकर त्याच्या आईवडिलांना घाबरतोय. पण गेल्या पाच वर्षांत आमचं नातं बहरलं, फुललं. आमचे स्वभावही जुळतात. मात्र मी सध्या कोंडीत सापडले आहे. मी काय करू?

उत्तर : आपलं नातं लग्नापर्यंत नेणं बरेचदा आव्हानात्मक असू शकतं. पालकांची भीती, जबाबदारीचं दडपण, लग्नाच्या कल्पनेमुळे येणारी अस्वस्थता अशी बरीच कारणं यासाठी देता येतील. आता तुझ्या पियकराच्या मनात कसली भीती आहे हे जाणून घे. तुमचं नातं पालकांसमोर उघड न करण्यामागच्या कारणांचा शोध घे. प्रियकराशी बोल. नेमकी कारणं जाणून घेतल्यानंतर काही निष्कर्ष काढ. नात्याबद्दलची त्याची मतं जाणून घे. हा गुंता सोडवण्यासाठी समुपदेशकांची मदतही घेता येईल. तू तुझ्या पालकांशी मोकळेपणाने बोल. थोडा वेळ मागून घे. सरतेशेवटी आपण कोणावरही नातं लादू शकत नाही. त्यामुळे या मुलाच्या मनातलं ओळखून मगच पुढे जा.

# तंत्र पुश अप्सचं

फिटनेस फंडा



पुश अप्स केल्यामुळे संपूर्ण शरीराला व्यायाम मिळतो. शरीराच्या वरच्या भागाच्या स्नायूंच्या बळकटीसाठी पुश अप्स खूप उपयुक्त ठरतात. पुश अप्ससाठी कोणत्याही उपकरणाची गरज नसते. त्यामुळे हा व्यायाम अगदी कुठेही करता येतो. तंदुरुस्तीसाठी कोणत्याही एका व्यायामाची निवड करायची असेल तर पुश अप्स हा सर्वोत्तम व्यायामप्रकार ठरतो. मात्र बरेच जण योग्य पद्धतीने पुश अप्स करतच नाहीत. काही जण कमी तर काही जण आवश्यकतेपेक्षा जास्त पुश अप्स करतात. उत्तम आरोग्यासाठी नेमक्या किती पुश अप्स करायला हव्यात याबाबतचं मार्गदर्शन...


पुश अप हा तुलनेने बराच कठीण व्यायामप्रकार आहे. नियमित सरावानेच तो जमू शकतो. सुरूवातीला पुश अप्स करताना त्रास होऊ शकतो. शिवाय स्थूल लोकांना पुश अप्स बऱ्याच अवघडही पडतात. पण काळजी करू नका.

सुरूवातीला दोन पुश अप्स जमल्या तरी तिथून सुरुवात करा. हळूहळू संख्या वाढवा. एका दिवसात किती पुश अप्स करायच्या यावर कोणतंही बंधन नाही. काही लोक ३०० पेक्षा जास्त पुश अप्सही करतात. पण दिवसाला ५० ते १०० पुश अप्स केल्याने तुम्हाला सगळे लाभ मिळू शकतात.

२० पुश अप्सने सुरूवात करा. पण या आकड्यावर थांबू नका. पुश अप्सची संख्या वाढवत रहा.

## टेक्नो टॉक

### इंटरनेटशिवायही कॉल करता येणार



'गुगल'ने तंत्रज्ञानविश्वात धमाका केला आहे. नव्याने लॉंच झालेल्या पिक्सेल १० सिरीजमधील एका अनोख्या फीचरने सर्वांना आश्चर्यचकित केले आहे. आता वापरकर्ते इंटरनेट कवा मोबाईल नेटवर्कशिवायही व्हॉट्स अपवर ऑडिओ आणि व्हिडीओ कॉल करू शकतील. सॅटेलाइट कनेक्टिव्हिटीच्या माध्यमातून ही सुविधा उपलब्ध होणार असून आपत्कालीन परिस्थितीत हे फीचर वरदान ठरणार आहे.

'गुगल'ने भारतासह जागतिक बाजारपेठेत पिक्सेल १० सिरिज लॉंच केली आहे. कंपनीच्या दाव्यानुसार सॅटेलाइट तंत्रज्ञानाद्वारे व्हॉट्स अप कॉलग ऑफर करणारी ही जगातील पहिली स्मार्टफोन सिरिज आहे. यामुळे नेटवर्क नसलेल्या दुर्गम भागातही संवाद साधणे शक्य होईल.

'गुगल'ने आपल्या 'एक्स' पोस्टमध्ये एक टीझर शेअर केला आहे. त्यात सॅटेलाइटद्वारे कॉलगची झलक दिसते. हे फीचर विशेषतः अशा ठिकाणी उपयुक्त ठरेल जिथे मोबाइल नेटवर्क कवा वायफाय उपलब्ध नसते.

# युवकांत जॉगर्स जीन्सची क्रेझ

स्टाईल स्टेटमेंट



फॅशन वेगाने बदलते. आजकाल जीन्स पुन्हा बदलत आहेत. आजची तरुणाई फॅशनमध्ये आरामही शोधते. यामुळेच आजकाल तरुणांमध्ये जॉगर्स जीन्स आणि ट्राउझर्सची मागणी वाढू लागली आहे. गेल्या काही महिन्यांमध्ये जॉगर्स जीन्स तरुणांमध्ये मोठी लोकप्रियता मिळवत आहेत. तज्ज्ञांच्या मते जॉगर्स जीन्स तरुणांना एक नवा आणि अनोखा लूक देत असून आरामाच्या बाबतीतही खास आहेत. त्यामुळे तरुणांना हा लूक खूप आवडू लागला आहे. विशेष म्हणजे जॉगर्स जीन्स आणि ट्राउझर्स पुरुष आणि महिला दोघांनाही आकर्षित करण्यात यशस्वी ठरत आहेत.

**जॉगर्स जीन्स म्हणजे काय?**

खरं तर जॉगर्स जीन्स हे जॉगग ट्राउझर्सचे रूपांतर आहे. ते जॉगग ट्राउझर्ससारखे दिसते. तसेच, ते अरुंद तळामुळे एक खास लूक देते. अक्षय कुमार, रणवीर सग, रणबीर कपूर, आयुष्मान खुराना, सैफ अली खान आणि जॉन अब्राहमसारखे अनेक स्टारदेखील या प्रकारच्या फॅशनमध्ये दिसले आहेत. तरुणाई ते टेक्स्चर्ड टी-शर्टसह घालणे पसंत करते, तर स्लोगन टी-शर्टसह ते खूप ट्रेंडगमध्ये आहे. तज्ज्ञांच्या मते या जीन्सच्या वाढत्या क्रेझचे मुख्य कारण म्हणजे त्याचा फंकी लूक. तरुणांमध्ये वाढत्या जिमग क्रेझमुळे हा लूकही लोकप्रिय ठरत आहे. प्रत्येक लूक आणि पॅटर्नमध्ये उपलब्ध जॉगर जीन्स विशेषतः ऑथेंटिक डेनिम रंगात पसंत केली जात आहे. यासोबतच लोक त्याच्या झिरो बॉटमबद्दलही वेडे आहेत.

डेनिम फॅब्रिक्सव्यतिरिक्त कॉटन, कॉटन पॉलिस्टर, लिनेन फॅब्रिक्सच्या जॉगर पँटस ट्रेंडमध्ये आहेत. ऑथेंटिक डेनिम पँटनंतर, कॅमोफ्लॉज (मिलिटरी) जॉगर पँटदेखील लोकांना खूप आकर्षित करत आहेत.

# ही ठिकाणे पाडतील मोहात

भन्नाट भटकंती

बाहेर फिरायला जाण्याचा प्लॅन करत असाल तर भारतात भेट देण्यासाठी अनेक ठिकाणे आहेत. काही लोकांना हिल स्टेशनवर जायला आवडते तर काहींना समुद्रकिनारी जायला आवडते.



**कॅलिम्पाँग, पश्चिम बंगाल**

हे एक असे हिल स्टेशन आहे, जिथे तुम्ही पूर्णपणे तणावमुक्त होऊ शकता. हे हिल स्टेशन पश्चिम बंगालमधील हिमालयाच्या पायथ्याशी आहे. सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिने येथे भेट देण्यासाठी सर्वोत्तम आहेत. आजूबाजूला हिरवळ आणि तेथील हिरवेगार चहाच्या बागा पाहायला मिळतील. या ठिकाणाचे सौंदर्य तुमचे मन मोहून टाकेल.

**मुन्नार, केरळ**

केरळ हे भारतातील सर्वात सुंदर राज्य आहे. मुन्नारमधील चहा आणि कॉफीच्या बागांचे सौंदर्य पाहण्यासारखे आहे. येथील शांत वातावरण तुम्हाला एका वेगळ्याच जगात घेऊन जाईल. तुम्ही मुन्नार येथील काही ठिकाणं एक्सप्लोर केल्यावर तणावमुक्त व्हाल.

**गंगटोक, सिक्कीम**

सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात गंगटोकला भेट देण्याचा एक चांगला पर्याय असू शकतो. येथील निसर्गसौंदर्यात तुम्ही हरवून जाल. ईशान्येकडील या हिल स्टेशनमध्ये तुम्हाला धुक्यांनी झाकलेल्या उंच पर्वतांचे आणि हिरव्यागार निसर्गाचे विहंगम दृश्य पाहता येईल. तुम्ही जगातील तिसऱ्या क्रमांकाचा उंच पर्वत असलेल्या कांचनजंगालादेखील भेट देऊ शकता. येथील सौंदर्य पाहण्यासारखे आहे.

**चक्राता, उत्तराखंड**

उत्तराखंडमधील चक्राता हेदेखील एक अतिशय सुंदर हिल स्टेशन आहे. त्याची उंची समुद्रसपाटीपासून २००० मीटर आहे. तुम्हाला येथील नैसर्गिक सौंदर्य आणि शांत वातावरण तणावमुक्त करेल. सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये येथील पर्वत धुक्यांनी वेढलेले असते. त्यामुळे त्याचे सौंदर्य आणखी मनमोहक दिसते.

**ताजमहाल, आग्रा**

ताजमहाल पाहण्यासाठी कधीही जाऊ शकता; परंतु उन्हाळ्यात या ठिकाणी जाण्याचे टाळा. कारण येथील कडक उन्हामुळे तुमचा प्रवास खराब होऊ शकतो; अर्थात ऑक्टोबरमध्ये ताजमहाल एक्सप्लोर करणे उत्तम राहील. ताजमहाल व्यतिरिक्त, तुम्ही आग्रा किल्ला, मेहताब बाग, जामा मशीद आणि अकबराचा मकबरादेखील पाहू शकता.

# एमआयडीसी परिसरात वाहने चोरणारी टोळी पकडली; महिंद्रा पिकअप, जितो तसेच मोटारसायकल हस्तगत

नगर – एमआयडीसी परिसरातून महिंद्रा पिकअप, जितो, तसेच मोटारसायकल ही वाहने चोरणारी टोळी पकडली पोलिसांनी पकडली असून या टोळीकडून चोरलेली वाहने हस्तगत करण्यात आली आहेत. आरोपींमध्ये प्रणव नितीन पठारे (रा. देवळाली प्रवरा, ता. राहुरी) याच्या सह २ अल्पवयीन मुलांचा समावेश आहे.


एमआयडीसी परिसरातून वाहने चोरणारी टोळी पकडल्यानंतर त्यांच्या समवेत एमआयडीसी पोलिसांचे पथक.

एमआयडीसी परिसरातील ट्रान्सपोर्ट व्यावसायिक मंगल किशोर शिंदे (वय ३४, रा. एल टी कॉलनी, चव्हाण शाळेपाठीमागे, एमआयडीसी) यांनी ८ सप्टेंबर रोजी फिर्याद दिली की, ७ सप्टेंबर रोजी मध्यरात्री त्यांच्या घराशेजारी लावलेल्या ३ पैकी एक महिंद्रा पिकअप (क्र.एम एच १६ ए वाय ९६५४) ही अज्ञात चोरट्यांनी चोरून नेलेली आहे. या फिर्यादी वरून एमआयडीसी पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहीता कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. तसेच २ सप्टेंबर रोजी नागापूर एमआयडीसी येथून अनिकेत लक्ष्मण पवार (वय २९, रा.चेतना कॉलनी) यांची महिंद्रा कंपनीची जितो गाडी ही अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याचा गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्यांचा तपास करत असताना स.पो.नि. माणिक चौधरी यांना गोपनिय माहिती मिळाली की, सदरचा गुन्हा हा प्रणव नितीन पठारे याने त्याचे साथीदारामार्फत केला असुन तो गुन्ह्यातील मुद्देमालासह मनमाड रोड, विळद बायपास जवळील पेट्रोल पंपाचे समोरील डोंगरा जवळ येणार आहे. ही माहिती मिळताच पोलिस पथकाने सदर ठिकाणी जावून आरोपी प्रणव पठारे याला त्याच्या २ अल्पवयीन साथीदारांसह पकडले. त्यांच्या ताब्यातून एमआयडीसी परिसरातून चोरलेले महिंद्रा पिकअप, जितो, तसेच मोटारसायकल ही ७ लाख ६० हजार रुपये किंमतीची वाहने हस्तगत करण्यात आली.

सदरची कारवाई स.पो.नि. माणिक बी. चौधरी यांचे मार्गदर्शनाखाली स.फौ. राकेश खेडकर, पो.हे.कॉ. संदीप पवार, सचिन आडवल, राजु सुद्रीक, पो.कॉ. किशोर जाधव, नवनाथ दहिफळे, ज्ञानेश्वर आघाव तसेच दक्षिण मोबाईल सेल अहिल्यानगर चे पो.कॉ. राहुल गुंडु यांचे पथकाने केली आहे.

# दरोडा टाकून बेदम मारहाण करत सोन्याचे दागिने लुटणाऱ्या टोळीचा 'म्होरक्या' पोलिसांनी पकडला

### सोने व चांदीचे दागिने हस्तगत, स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

नगर – नगर तालुक्यातील निमगाव वाघा शिवारात अनिल मारुती गुंजाळ यांच्या घरावर २२ ऑगस्ट रोजी पहाटेच्या सुमारास सशस्त्र दरोडा टाकत गुंजाळ कुटुंबीयांवर जीवघेणा हल्ला करून सोन्या चांदीचे दागिने लुटून नेणाऱ्या टोळीच्या म्होरक्याला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नगर तालुक्यातील चास शिवारात पकडले आहे. विकी संजय काळे (वय ३०, रा. भोरवाडी, ता.नगर) असे त्याचे नाव असून तो रेकॉर्ड वरील सराईत गुन्हेगार आहे. त्याच्या कडून लुटीतील ३१ हजार रुपये किंमतीचे सोन्या चांदीचे दागिने हस्तगत करण्यात आले आहेत.


दरोडा टाकून बेदम मारहाण करत दागिने लुटणाऱ्या टोळीचा म्होरक्याला पकडल्यानंतर त्याच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

या घटनेबाबत नगर तालुका पोलिस ठाण्यात जबरी चोरी आणि जीवघेणा हल्ल्याचा गुन्हा दाखल करण्यात आलेला होता. त्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेकडून सुरु होता. या दरम्यान पो.नि. किरणकुमार कबाडी यांना सदर गुन्हा रेकॉर्डवरील आरोपी विकी संजय काळे यांने व त्याचे साथीदारांनी केला असून, तो चास शिवारात असल्याची गोपनीय माहिती मिळाली.या माहितीच्या आधारे त्यांनी तात्काळ स्थानिक गुन्हे शाखेतील स.पो.नि. हरिष भोये, स.फौ. रमेश गांगर्डे, पो.हे.कॉ. दिपक घाटकर, पो.कॉ. भाऊसाहेब काळे, अमोल कोतकर, बाळासाहेब खेडकर, प्रशांत राठोड, चालक स.फौ. महादेव भांड यांच्या पथकाला कारवाई साठी पाठविले.

पथकाने चास शिवारात शोध घेवून आरोपी विकी काळे याला ताब्यात घेतले. त्यांचेकडे विचारपुस केली असता, त्यांने सदर सदरचा गुन्हा स्वत: व इतर साथीदार सुरेश उर्फ पटया आण्णा भोसले, मंगेश रामदास काळे (दोघे रा. पाटोदा, ता. जामखेड), वैभव उर्फ मुक्या किरन भोसले (रा. धानोरा, ता. आष्टी, जि. बीड), सुशांत सुरेश भोसले (रा. कामरगांव, ता.नगर) अशांनी मिळुन केल्याचे सांगितले. आरोपीला ताब्यात घेवुन, आरोपीची अंगझडती घेतली असता, त्याचेकडे ३१ हजार रुपये किंमतीचे सोने व चांदीचे दागिने असा मुद्देमाल मिळुन आला. त्यास मुद्देमालासह नगर तालुका पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# शोरूम फोडून चोरी करणारे तिघे सराईत आरोपी गजाआड

### लॅपटॉप, मोबाईल हस्तगत,पोलिसांची कारवाई

नगर –नगर ते छत्रपती संभाजीनगर रस्त्यावरील शेंडी (ता. नगर) शिवारातील जिप मोटर्स शोरूम फोडून केलेल्या चोरीचा गुन्हा एमआयडीसी पोलिसांनी उघडकीस आणून या गुन्ह्यातील तिघे सराईत चोरटे पकडले आहेत. त्यांच्या ताब्यातून चोरीस गेलेला लॅपटॉप, दोन मोबाईल तसेच घरफोडी करण्यासाठी वापरलेले साहित्य हस्तगत करण्यात आले आहेत.



शेंडी शिवारात अभिमन्यू इंद्रजित नय्यर यांचे जिप मोटर्स शोरूम आहे. त्या ठिकाणी अफ्रिदी रशिद सय्यद (रा. फकीरवाडा, डी.एस.पी. चौक, अहिल्यानगर) हे जनरल मॅनेजर असून, त्यांनी ३ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता शोरूम बंद केले होते. दुसर्या दिवशी ४ सप्टेंबर रोजी सकाळी ९.३० वाजता शोरूम उघडल्यावर काचेच्या दरवाज्याचे कुलूप तोडून चोरी झाल्याचे निदर्शनास आले होते. चोरट्यांनी लॅपटॉप, मोबाईल व रोकड चोरून नेली होती. या प्रकरणी सय्यद यांच्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचा तपास सुरू असताना सहायक पोलीस निरीक्षक माणिक चौधरी यांना माहिती मिळाली की चोरी करणारे तिघे संशयित पोखर्डी (ता. नगर) शिवारात आहेत. पोलिसांनी पथकासह तेथे धाड टाकून संशयितांना पाठलाग करून पकडले. चौकशीत त्यांनी आपली नावे हृतिक दार्या चव्हाण (रा. काळामाथा, गजराजनगर), सुंदर नितीन काळे व संजय ऊर्फ चोच दार्या चव्हाण (दोघे रा. डायमंड स्टाईलमागे, काळामाथा, गजराजनगर) अशी सांगितली.

पुढील चौकशीत तिघांनी मिळून चोरी केल्याची कबुली दिली. हे तिन्ही संशयित आरोपी सराईत असून त्यांच्या विरोधात पूर्वीही एमआयडीसी व कोतवाली पोलीस ठाण्यात अनेक गुन्हे दाखल आहेत. ही कारवाई सहायक पोलिस निरीक्षक चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार राकेश खेडकर, राजु सुद्रीक, संदीप पवार, सचिन आडबल, किशोर जाधव, नवनाथ दहिफळे, ज्ञानेश्वर आघाव, दीपक फुंदे, राहुल गुंड्डू यांच्या पथकाने केली आहे.

# जागतिक फिजिओथेरपी दिनानिमित्त महानगरपालिकेत आरोग्य शिबीर, अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या तपासणीसह तज्ज्ञांकडून व्यायामाची प्रात्यक्षिके

### कर्मचारी व अधिकाऱ्यांमध्ये आरोग्यविषयक जनजागृती होऊन कार्यक्षमतेत वाढ होईल : आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे

नगर–जागतिकफिजिओथेरपी दिनाचे औचित्य साधून अहिल्यानगर महानगरपालिकेत आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांच्या पुढाकारातून कर्मचारी व अधिकाऱ्यांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरातफिजिओथेरपिस्टतज्ज्ञांनी पाठदुखी, मानदुखी, गुडघेदुखी, पाठीच्या कण्यातील विकार तसेच सांधेदुखी यांसारख्या सामान्य परंतु महत्त्वाच्या समस्या ओळखून त्यावर मार्गदर्शन केले. दीर्घकाळ कार्यालयीन कामकाजामुळे निर्माण होणारा शारीरिक ताण, चुकीच्या बसण्याच्या पद्धतीमुळे होणारी वेदना आणि हालचालीतील मर्यादा यावर उपाययोजना सुचवून सोप्या व्यायामाची प्रात्यक्षिके दाखवून जनजागृती करण्यात आली.



जागतिक फिजिओथेरपी दिनानिमित्त महानगरपालिकेत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले याप्रसंगी आयुक्त यशवंत डांगे आदी. शेजारील छायाचित्रात व्यापाची प्रात्यक्षिके दाखविताना तज्ज्ञ मार्गदर्शक. (छाया – लहू दळवी)

शिबिरात कर्मचाऱ्यांची प्राथमिक तपासणी करून कर्मचाऱ्यांना नियमित व्यायाम, योग्य आसनपद्धती, सकस आहार व सक्रिय जीवनशैली अंगीकारण्याचे आवाहन करण्यात आले. फिजिओथेरपिस्टांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे सोपे व्यायाम, स्ट्रेचिंग तंत्रे, ऑफिसमध्येच करता येतील असे लहानसे व्यायाम दाखवले. शिबिरात सहभागी कर्मचारी व अधिकाऱ्यांनी वैयक्तिक समस्यांवर तज्ज्ञांचा सल्ला घेतला. काही कर्मचाऱ्यांनी या निमित्ताने आपली शरीरस्थिती तपासून घेऊन पुढील उपचार व काळजी याबाबत मार्गदर्शन घेतले. या शिबिरामुळे कार्यरत कर्मचाऱ्यांना केवळ आजारपणावर उपायच नव्हे तर भविष्यात उद्भवणाऱ्या शारीरिक समस्यांना प्रतिबंध घालण्याबाबतही जागरूकता निर्माण झाली.

यशवंत डांगे म्हणाले की, जागतिक फिजिओथेरपी दिन दरवर्षी ८ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. या दिवशी फिजिओथेरपीच्या महत्त्वाची जनजागृती केली जाते. नागरिकांना औषधाविना उपचाराच्या या शास्त्राचे फायदे समजावले जातात.

महानगरपालिकेने घेतलेले हे शिबिर केवळ कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या आरोग्यविषयक फायद्यासाठीच नव्हे तर कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठीही महत्त्वाचे ठरेल, असा विश्वास यशवंत डांगे यांनी व्यक्त केला.

# मुख्याध्यापक डॉ.सुदर्शन धस यांना 'आदर्श शिक्षक पुरस्कार' जाहीर

नगर – रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल, दापुर या विद्यालयाचे मुख्याध्यापक व साहित्यिक डॉ. सुदर्शन चंद्रशेखर धस यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्य करणाऱ्या लायन्स क्लब ऑफ सिन्नर सिटी मार्फत २०२५ चा आदर्श शिक्षक पुरस्कार नुकताच जाहीर करण्यात आला.



शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या अध्यापकांना दरवर्षी या संस्थेमार्फत गौरविण्यात येते. डॉ.धस यांनी विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्तावाढ, शालेय भौतिक सोयी सुविधांसाठी सामाजिक योगदानातून केलेले विशेष प्रयत्न तसेच त्यांच्या शैक्षणिक, साहित्यिक व सांस्कृतिक क्षेत्रातील कार्याची नोंद घेत त्यांना यावर्षीचा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर करण्यात आला.


माउंट लिटेरा झी स्कूल येथे शिक्षक दिन व गणेश विसर्जन उत्साहात पार पडला.

# माउंट लिटेरा झी स्कूलमध्ये शिक्षक दिन व गणेश विसर्जन उत्साहात

नगर – माउंट लिटेरा झी स्कूल, दौंड रोड अरणगाव येथे ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या दिवशी विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका पार पाडत वर्गात शिकविण्याचा अनुभव घेतला. त्यामुळे त्यांना एका दिवसासाठी शिक्षक होण्याचा आनंद मिळाला.

६ सप्टेंबर रोजी शाळेत गणेश विसर्जन सोहळा पार पडला. यावेळी विद्यार्थ्यांसाठी गणपती स्तोत्र स्पर्धा घेण्यात आल्या. पारंपरिक सण साजरा करण्यामागील महत्व विद्यार्थ्यांना सांगण्यात आले.

या प्रसंगी शाळेच्या प्राचार्या प्रा. शैलजा लोटके यांनी उत्सव साजरे करताना शिस्तबद्धरित्या आनंद घेणे तितकेच महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन केले. सर्व वयोगटातील विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्साहाने सहभाग घेतला.

# अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसीला अतिउत्तम श्रेणी प्राप्त

नगर – अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसी, केडगाव, अहिल्यनगर यांना राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांच्यामार्फत शैक्षणिक वर्ष २०२४–२५ साठी झालेल्या शैक्षणिक परीक्षणामध्ये अतिउत्तम श्रेणी बहुमान प्राप्त झाला आहे. ही माहिती प्राचार्य डॉ. योगेश बाफना यांनी दिली.



शैक्षणिक परीक्षण समितीने महाविद्यालयातील अध्यापन पद्धती, गुणवत्तापूर्ण प्रयोगशाळा सुविधा, विद्यार्थी विकासासाठी राबविले जाणारे उपक्रम, तसेच प्रशासनातील पारदर्शकता या सर्व बाबींचा सखोल आढावा घेतला. या सर्व निकषांमध्ये महाविद्यालयाने उल्लेखनीय कामगिरी बजावल्यामुळेच अतिउत्तम श्रेणी प्रदान करण्यात आली आहे. प्राचार्य डॉ. योगेश बाफना यांनी सांगितले की, आगामी काळात संस्था विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी नवनवीन उपक्रम राबविणे, अत्याधुनिक प्रयोगशाळा व संशोधन केंद्र उभारणे, तसेच जागतिक दर्जाचे शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यासाठी कटिबद्ध राहील.

या यशाबद्दल प्राचार्य डॉ. योगेश बाफना यांच्यासह प्राध्यापिका सौ. माधुरी पवार, सौ. प्रतिक्षा गांधी, सौ. वृशाली गायकवाड, कु. शितल खंडागळे, सौ. रुचिता पवार तसेच सर्व शिक्षकेतर कर्मचारी यांचे अभिनंदन करण्यात आले.

# ब्रह्माकुमारीतर्फे २६ ते ३० सप्टेंबरदरम्यान 'राष्ट्रीय मीडिया महासंमेलना'चे आयोजन

आबू रोड (राजस्थान) – शांतिवन कॅम्पस येथे मीडिया विंगच्या सौजन्याने राष्ट्रीय मीडिया महासंमेलन आयोजित करण्यात आले आहे. हे महासंमेलन २६ ते ३० सप्टेंबर दरम्यान होणार आहे.

या वर्षीच्या महासम्मेलनाचा विषय आहे – समाजात शांती, एकता आणि विश्वास प्रस्थापित करण्यासाठी माध्यमांची भूमिका (Role of Media for Promoting Peace, Unity Trust in Society) या परिषदेत देशभरातून माध्यम क्षेत्राशी संबंधित विविध प्रतिनिधींना आमंत्रित करण्यात आले आहे. त्यामध्ये वृत्तपत्र व मासिकांचे मालक, प्रकाशक, संपादक व संवाददाता, रेडिओ व टीव्ही चॅनेल्सचे सीईओ, डायरेक्टर, कार्यक्रम अधिकारी व पत्रकार, माहिती मंत्रालयाचे अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, न्यूज एजन्सीचे प्रतिनिधी, मीडिया प्राध्यापक व विद्यार्थी, लेखक, स्क्रिप्ट रायटर, चित्रपट निर्माता, छायाचित्रकार, व्हिडिओग्राफर, सोशल मीडिया तज्ज्ञ, पब्लिकेशन व प्रिंटिंग प्रेस प्रतिनिधी, चित्रपटगृह संचालक, केबल ऑपरेटर तसेच टपाल विभागाचे अधिकारी यांचा समावेश आहे.

या महासंमेलनात अंदाजे १५०० मीडियाकर्मी तसेच ३०० बीके सेवाधारी सहभागी होणार असून मीडिया प्रतिनिधींसोबत त्यांचे कुटुंबीय (पती/पत्नी व १८ वर्षांपेक्षा जास्त वयाची मुले) देखील सहभागी होऊ शकतील. परिषदेत सहभागी होण्यासाठी ऑनलाइन नोंदणी अनिवार्य करण्यात आली आहे. नोंदणीसाठी आपल्या स्थानिक ब्रह्माकुमारी सेवाकेंद्रात संपर्क साधावा किंवा डॉ. दीपक हरके मोबाईल क्रमांक ९१२२२८८८८८ वर संपर्क साधावा.


चक्रधर स्वामी प्राथमिक विद्यालयात 'एक दिवसाचे शिक्षक' कार्यक्रमामध्ये सहभागी झालेले शिक्षक व विद्यार्थी.

# चक्रधर स्वामी प्राथमिक विद्यालयात 'एक दिवसाचे शिक्षक' कार्यक्रम उत्साहात

नगर – नागापूर ग्रामीण विकास मंडळ संचलित चक्रधर स्वामी प्राथमिक विद्यालयात शिक्षक दिनानिमित्त 'एक दिवसाचे शिक्षक' हा एक आगळावेगळा उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमात इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका बजावली आणि अध्यापनाचा अनुभव घेतला.

या कार्यक्रमात इयत्ता सातवीची विद्यार्थिनी सिद्धी गाडेकर हिने मुख्याध्यापिकापदाची जबाबदारी सांभाळली. इतर विद्यार्थ्यांनी पहिली ते सहावीच्या वर्गात जाऊन विद्यार्थ्यांना विविध विषय शिकवले. या संपूर्ण अनुभवातून शिक्षकाची भूमिका किती महत्त्वाची आणि जबाबदारीची असते, याची जाणीव विद्यार्थ्यांना झाली.

एका दिवसासाठी शिक्षक झालेल्या या विद्यार्थ्यांनी सांगितले, वर्गात फक्त शिकवणेच नव्हे, तर विद्यार्थ्यांना शिस्त लावणे, त्यांच्या शंकांचे निरसन करणे आणि वर्गातील वातावरण सकारात्मक ठेवणे हे काम असते. शिक्षकाची भूमिका बाहेरून दिसते तितकी सोपी नाही, हे आम्हाला आज कळले. या अनुभवाने त्यांच्या मनात शिक्षकांबद्दलचा आदर आणखी वाढला.

या उपक्रमासाठी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती कासार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच सांस्कृतिक विभाग प्रमुख कोकाटे आणि इतर सर्व शिक्षकांनी या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहकार्य केले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणाऱ्या आणि त्यांना जबाबदारीची जाणीव करून देणाऱ्या या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

# विद्युत निरीक्षक कार्यालयाच्यावतीने वृक्षारोपण

### आंबा, जांभूळ, वड, पिंपळ यांसारख्या देशी झाडांची लागवड

नगर – पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करत विद्युत निरीक्षक कार्यालय, अहिल्यानगर आणि स्पार्क इंडस्ट्रीज यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण अभियान राबविण्यात आले. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या दिल्ली गेट येथील सब स्टेशन परिसरात या उपक्रमांतर्गत आंबा, जांभूळ, वड, नारळ, पिंपळ यांसारख्या पर्यावरणपूरक देशी झाडांची लागवड करण्यात आली. या अभियानाप्रसंगी विद्युत निरीक्षक श्रीमती रा. सं. गीते, अभियंते योगेश सातपुते, समीर सहाणे, अमर स्वामी, श्रीमती शेख, चव्हाण तसेच स्पार्क इंडस्ट्रीजचे श्रीनिवास पाटील उपस्थित होते.


विद्युत निरीक्षक कार्यालय आणि स्पार्क इंडस्ट्रीज यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण अभियान राबविण्यात आले.

कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण यांनी सांगितले की, हवामान बदलामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. त्यावर उपाय म्हणून वृक्षारोपण अत्यावश्यक आहे. प्रत्येक कुटुंबाने किमान दोन झाडे लावून त्यांचे संवर्धन करणे ही आजच्या काळाची गरज असल्याचे स्पष्ट केले.

त्याचप्रमाणे अभियंता योगेश सातपुते यांनी महावितरण कंपनीने या उपक्रमासाठी जागा उपलब्ध करून दिल्याबद्दल तसेच स्पार्क इंडस्ट्रीज यांनी झाडांचे संवर्धन करण्याची जबाबदारी स्वीकारल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. या उपक्रमाला अति. कार्यकारी अभियंता कुमावत यांचे मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले.



वर्का चॅरिटेबल ट्रस्टच्या वर्का स्कूल अँण्ड ज्युनियर कॉलेजमध्ये करीअर कौन्सिलिंग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

# वर्का स्कूलमध्ये करिअर कौन्सिलिंग शिबिराचे आयोजन

नगर– अरणगाव येथील वर्का चॅरिटेबल ट्रस्टच्या वर्का स्कूल अँण्ड ज्युनियर कॉलेजमध्ये करीअर कौन्सिलिंग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सीए जयेश रोहीडे यांनी सीए होण्यासाठी आवश्यक ती पात्रता सांगितली. सीए बनण्यासाठी लागणाऱ्या खर्चाची माहिती सांगितली.तसेच परिक्षेचे स्वरूप, विषय यासंदर्भात माहिती दिली. परिक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी आवश्यक गुण आणि या परिक्षा वर्षातून दोनदा देता येत असून वयाची अट नसल्याचे त्यांनी सांगितले. आपल्यातील क्षमता ओळखून योग्य ते करिअर निवडण्यास विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी वर्का स्कूलचे मुख्याध्यापक डॉ.रामीन हुसैन, उपमुख्याध्यापिका शबनम खान, फिनिक्स ॲकॅडमीच्या मुख्याध्यापिका मिताली बाजपेयी आणि सर्व शिक्षक वर्ग उपस्थित होते.

